www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी

दै. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 261 वा गुरुवार दि. 05 जून २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514

## दृष्य सत्य
### जनतेच्या नजरेतून
शासनाच्या दरबारात

### "स्वच्छतागृह स्वच्छ ठेवा, आरोग्य सुरक्षित ठेवा"संदेशाचा ग्रामपंचायत आसडी (ता.सिल्लोड) ला विसर.



दैनिक युवक आधार प्रतिनिधी
:- योगेश पालोदकर

**ग्रामपंचायत स्वच्छतागृहाच्या अस्वच्छ दुर्गंधीमुळे लोक हैराण, ग्रामपंचायतीने तातडीने साफसफाई करावी नागरिकांची मागणी.**

## नाट्य महोत्सवाला उत्स्फूर्त प्रतिसाद
### लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सपत्नीक घेतला नाटकाचा आनंद

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५ व्या अर्थात अमृत महोत्सवी वर्ष पदार्पणानिमित्त अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, पनवेल शाखा आणि श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय नाट्य महोत्सवाला उदंड प्रतिसाद लाभला. 'एका लग्नाची पुढची गोष्ट' आणि 'कुटुंब किर्रतन' या सुप्रसिद्ध अशा दोन विनोदी नाटकांची पर्वणी नाट्य रसिकांना मिळाली होती, आणि हे दोन्ही प्रयोग हाऊसफुल झाले होते.

पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात सुप्रसिद्ध नाट्य व सिने अभिनेते प्रशांत दामले, तसेच कविता मेडेकर अतुल तोडणकर यांची प्रमुख भूमिका असलेले 'एका लग्नाची पुढची गोष्ट' तर सुप्रसिद्ध अभिनेते संकर्षण कऱ्हाडे, तन्वी मुंडले, अमोल कुलकर्णी आणि वंदना गुप्ते यांची भूमिका असलेले 'कुटुंब किर्रतन' या नाटकांचे सादरीकरण झाले. यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर आणि त्यांच्या पत्नी शकुंतला ठाकूर



यांनीही या नाटकांचा आस्वाद घेतला. दरम्यान लोकनेते रामशेठ ठाकूर व रंगकर्मी प्रशांत दामले यांची नाट्य महोत्सवाच्या निमित्ताने भेट झाली. यावेळी प्रशांत दामले यांनी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त व ७५ व्या अर्थात अमृत महोत्सव वर्षातील पदार्पणाबद्दल शुभेच्छा दिल्या. प्रशांत दामले हे लोकनेते रामशेठ ठाकूर यांना आदराने दादा म्हणून साद घालतात, दोघांचीही ओळख खूप जुनी जेव्हा दोघे भेटतात तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर एक तेज असतो. आणि त्याची अनुभूती या भेटीच्या दरम्यान आली. प्रशांत दामले आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांची ओळख ही अनेक वर्षांची असून त्यांच्यातील स्नेह आणि परस्पर सन्मानाचे बंध या भेटीद्वारे पुन्हा अधोरेखित झाले. दोघांच्या चेहऱ्यावर त्या प्रसंगी दिसणारे समाधान आणि प्रसन्नता उपस्थितांचे मन जिंकून गेली.

## सिल्लोड शहरातील मुख्य रस्ता व चौकातील फळ विक्रेते यांचे अतिक्रमण हटवा
### . शिवसेना शहर (उबाठा) गटातर्फे पोलीस निरीक्षकांना निवेदन

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** :- शहरातील मुख्य रस्ता तसेच रस्त्यावरील फळ विक्रेत्यामुळे रस्त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना तसेच वाहन चालकांना त्रास होत असून याकडे तात्काळ पोलिस प्रशासनाने लक्ष द्यावे, अन्यथा पोलिस अधीक्षक कार्यालयात हातगाडी लावा आंदोलन करण्यात येईल असा इशारा शिवसेना शहर(उबाठा) पक्षाच्या वतीने देण्यात आले आहे. सिल्लोड शिवसेना शहर पक्षाच्या वतीने शहर पोलिस ठाण्यात निवेदन देण्यात आले आहे. या निवेदनात पुढे असे म्हटले आहे की, सिल्लोड शहरातील मुख्य रस्ता तसेच रस्त्यावरील फळ विक्रेत्यांमुळे रोडवर जाणाऱ्या येणाऱ्या नागरिकांना तसेच वाहन चालकांना त्रास होत असून बऱ्याच वेळेस कार्यालयास तोंडी व लेखी निवेदन देऊन सुद्धा त्यावर काहीही कायमस्वरूपी कार्यवाही होत नाही. तसेच या मुख्य रस्त्यावर व चौकात दोन वेळेस हिंदू मुस्लिम वाद देखील या ठिकाणी पंधरा दिवसात झालेले असून याची आपण दखल घ्यावी व हे शहर सामान्य लोकांना वावरता यावे यासाठी आपण जातीने लक्ष घालावे नसता शिवसेना स्टाईलने रस्त्यावर उतरावे लागेल असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे. तसेच या आठ दिवसात आपण जर याची दखल घेतली नाही तर जिल्हा ग्रामीण पोलीस अधीक्षक यांच्या कार्यालयात हात गाडी लावा आंदोलन करण्यात येईल असा इशारा देण्यात आला आहे.

आम्ही नेहमी पेट्रोलिंग दरम्यान दररोज फळ विक्रेत्यांच्या हातगाड्या हटवतो. अतिक्रमण हटवणे हे नगर परिषदेचे काम आहे. सदर पत्र आम्ही नगरपरिषदला पाठवुन त्यांना पोलीस मदत देऊन कारवाई करू.
**-शेषराव उदार**
**पोलीस निरीक्षक, सिल्लोड**

## शिक्षकांचा अपमान थांबवा, नियोजनसंपन्न आणि मानवतेशी सुसंगत प्रशिक्षण द्या!- शेख अब्दुल रहीम

दैनिक युवक आधार
वार्ताहर



"शासनाच्या बेजबाबदार आणि नियोजनशून्यतेचा भीषण परिणाम; शिक्षक पाणी शिवाय तहानलेलेच घरी परतले"

सध्या २ जून पासून वरिष्ठ व निवड श्रेणीचे सुरू असलेले प्रशिक्षण राज्यभर एकाच दिवशी घेण्याच्या शासनाच्या निर्णयामुळे शिक्षकांना भयंकर हालअपेष्टा सहन कराव्या लागत आहेत. ना नियोजन, ना सोयी – हे शिक्षकांचा अपमानच होय! शासनाने प्रत्येक शिक्षकाकडून प्रशिक्षणासाठी २००० रुपये फी स्वरूपात वसूल केले. मात्र, या शुल्कातून साध्या चहा-पाण्याचीही व्यवस्था करण्यात आलीनाही. शिवाय शिक्षकांना त्यांच्या मूळ तालुक्याऐवजी ८०–९० किमी लांब असलेल्या इतर तालुक्यांमध्ये पाठवले गेले. त्यामुळे शिक्षकांना प्रवासाचा त्रास, वेळेची नासाडी आणि आर्थिक खर्च सहन करावा लागत आहे.

**एवढेच नव्हे तर पहिल्याच दिवशी प्रशिक्षणात तांत्रिक अडचणींनी कहर केला –**
* सर्व्हर डाऊन
* स्क्रीन फ्रीझ
* प्रश्नपत्रिका लोड न होणे
* सबमिट बटण निष्क्रिय

या सर्व अडचणींमुळे हजारो शिक्षक परीक्षाच पूर्ण करू शकले नाहीत. शासनाने परीक्षा वेळेत न दिल्यास प्रशिक्षण रद्द करण्याची अट घातली आहे, जी शिक्षकांच्या मानसिक आरोग्यावर गंभीर परिणाम करत आहे. त्याचबरोबर, उर्दू माध्यमातील शिक्षकांवरही अन्याय झाला आहे. त्यांना मराठीतून प्रशिक्षण देण्यात येत असून मातृभाषेत शिकण्याचा हक्क हिरावला गेला आहे. विशेष म्हणजे, उर्दू शिक्षकांना कोणताही लिखित अभ्याससामग्री पुरवण्यात आलेली नाही.

या सर्व त्रासांमुळे शिक्षकांचा संयम सुटत आहे व राज्यभरात शिक्षकांमध्ये शासन विरोधात रोष व्यक्त केला जात आहे. याविरोधात हॅप्पी टू हेल्प फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम यांनी राज्य शैक्षणिक व प्रशिक्षण परिषद पुणेचे संचालक राहुल रेखावार आणि उपसंचालक (प्रशिक्षण) माधुरी सावरकर यांच्याकडे तातडीने उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

## आ.थोरवे यांनी केलेल्या खासदार सुनील तटकरे यांच्या वरील टीकावर सुधाकर घारे आक्रमक
घारेंच्या स्वप्नात आमदार थोरवेच दिसत असतील अशी सोशल मीडियावर मिश्कील चर्चा ...

दैनिक युवक आधार
खोपोली-वार्ताहर

राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्यावर टीका केल्याशिवाय आमदार महेंद्र थोरवेंचे दुकान चालत नाही असे सांगत कर्जत येथील पत्रकार परिषदेत आमदार थोरवे यांच्या कथित आरोपांचा पाढा हातात माहितीच्या अधिकारा खालील पुरावे घेऊन राष्ट्रवादीचे नेते सुधाकर घारे वाचताना दिसले . महाडचे मतदार संघांचे आमदार मंत्री भरत गोगावले यांच्या वाढदिवसाच्या कार्यक्रमात महाड येथे कर्जत खालापूरचे आमदार महेंद्र थोरवे यांनी खासदार सुनील तटकरे यांच्यावर जोरदार टीका केली होती, त्या टिकेला कर्जत खालापूर मधील राष्ट्रवादी कॉंग्रेसचे नेते सुधाकर घारे यांनी जोरदार प्रतिउत्तर दिले आहे, राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्यावर टीका केल्याशिवाय आमदार महेंद्र थोरवेंचे दुकान चालत नाही, २०२९ ला खासदार सुनील तटकरे यांना पाडण्यापेक्षा तुम्ही राजीनामा देऊन आमच्या विरोधात पुन्हा निवडणूक लढवा मग कळले कोण आमदार होणार आणि कोण माजी होतंय, असा जोरदार टोला राष्ट्रवादीचे नेते सुधाकर घारे यांनी आमदार महेंद्र थोरवे यांना लागवला आहे राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी आयोजित राष्ट्रवादी भवनात पत्रकार परिषदेत सुधाकर घारे बोलत होते यावेळी त्यांनी कर्जत खालापूर मतदार संघात प्रशासनावर होत असलेली दडपशाही आणि वाढत असलेली गुंडागिरी या दबाव तंत्राला आम्ही कदापी खपवून घेणार नसून याला आमचा कायम जोरदार विरोध असेल व आमच्या पक्षश्रेष्ठींच्या विरोधात भाष्य केल्यास जसाच तसें उत्तर देऊ असा इशारा ही घारे यांनी देत नाराजी व्यक्त केली. हातात माहितीच्या अधिकारातील प्राप्त असलेले कागदी पुरावे दाखवत कर्जत पोलीस स्टेशनंच्या पिआय यांना फोन करून कशाप्रकारे धमाकावत असल्याची माहिती सुधाकर घारे यांनी यावेळी दिली आहे, कर्जत खालापूर मतदार संघाची बीड आणि बिहार पेक्षा वाईट अवस्था येथील आमदार आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी केली असल्याचा आरोप ही सुधाकर घारे यांनी यावेळी केला . तर न्यायालयात आमदार थोरवे यांच्या आमदारकीच्या विरोधात हायकोर्टात आम्ही केस दाखल केली असून तिचा निकाल लवकरच लागणार असून यावेळी आमदार महेंद्र थोरवे यांची आमदारकी जाणार असल्याची माहिती राष्ट्रवादीचे नेते सुधाकर घारे यांनी दिली आहे. या विषयाच्या प्रतिक्रियेत विविध सोशल मीडियाच्या माध्यमातून आमदार महेंद्र थोरवे यांच्या समर्थक, कार्यकर्ते व शुभचिंतकांनी घारे यांच्या स्वप्नात ही रात्री महेंद्र थोरवे दिसतात अशी मिश्किल प्रतिक्रिया व्यक्त केलेली पाहायला मिळाली.

## हसतमुख निलेशचा 'खून' की आत्महत्या ?
### न्हाव्यात खळबळ; पोलीस तपासाच्या प्रतिक्षेत गावकरी !"

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी प्रमुख**



हसतमुख स्वभावाचा, सगळ्यांशी मिळून मिसळून राहणारा न्हावे गावातील निलेश विकास ठाकूर याचा मृत्यू घातपात असल्याचा गंभीर संशय नातेवाईक आणि ग्रामस्थांनी व्यक्त केला आहे. पोलीस यंत्रणेने सखोल चौकशी करून या प्रकरणातील 'खरा सूत्रधार' गजाआड टाकावा, अशी जोरदार मागणी केली जात आहे. अधिक तपास पोलीस करीत आहेत. 26 मे रोजी निलेशचा मृतदेह गावातील स्मशानभूमीत झाडाला लटकलेल्या अवस्थेत आढळून आला. रविवारी रात्रीपासूनच तो बेपत्ता होता. मुसळधार पावसात घराबाहेर गेलेल्या निलेशचा दुसऱ्या दिवशी असा मृतदेह सापडल्याने गावात खळबळ उडाली आहे. विशेष म्हणजे, निलेशचा कोणाशीही वाद नव्हता. तो नेहमी आनंदी, स्नेही स्वभावाचा होता. मात्र काही मित्रांची मंडळी त्याच्या आजूबाजूला कायम दिसायची. तरीही या धक्कादायक घटनेबाबत कोणालाही काही कल्पना नाही, हे आणखीनच संशय वाढवणारं आहे. नातेवाईकांचा ठाम आरोप आहे की, "हा आत्महत्येचा प्रकार नसून थेट घातपात आहे!" घटनास्थळाची परिस्थितीच संशयास्पद आहे. इतका शांत आणि समजूतदार मुलगा अचानक असं टोकाचं पाऊल का उचलेल? रात्री उशिरा निलेशच्या मोबाईलवर वारंवार येणारे फोन हाही संशयाचा विषय ठरत आहे. या कॉल्सचा तपास लावल्यास प्रकरणातला खरा चेहरा समोर येईल, असं ग्रामस्थांचं ठाम मत आहे.

आता सर्वांची नजर पोलीस यंत्रणेवर लागली असून निलेशच्या कुटुंबीयांना न्याय मिळण्यासाठी, संबंधितांवर कठोर कारवाई व्हावी, अशी मागणी गावातून जोर धरू लागली आहे. हा प्रकार फक्त 'आत्महत्या' नसून घातपात असल्याचा संशय या परिसरात व्यक्त केला जात आहे. याबाबत पोलिसांशी संपर्क साधला असता त्यांनी पुढील तपास सुरू असल्याचे सांगितले

## लोहा-कंधार विधानसभा मतदार संघाचे राष्ट्रवादी कॉँग्रेस पक्षाचे आमदार प्रताप पाटील चिखलीकर यांच्या विषयी खुप माठ्याचर्चेला वेग

दैनिक युवक आधार
नांदेड प्रतिनिधी
चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर

नांदेड - लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघ राष्ट्रवादी कॉंग्रेसला सुटल्याने राजकीय तडजोडीपोटी आ. प्रताप पाटील चिखलीकर यांना भाजप सोडून राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये जावे लागले ही वस्तुस्थिती असून, पुढील काळात ते पुन्हा भारतीय जनता पक्षात प्रवेश करतील, असे सूतोवाच नांदेड महानगर भाजपचे अध्यक्ष अमरनाथ राजूरकर यांनी केले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे माझे नेते असून, राष्ट्रवादी कॉंग्रेसमधील माझा प्रवेश ही केवळ 'पॉलिटिकल 'एडजस्टमेंट' होती, असे विधान आ. प्रताप पाटील चिखलीकर यांनी नुकतेच केले होते. याबाबत प्रतिक्रिया देताना अमरनाथ राजूरकर म्हणाले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची लोकप्रियता आणि स्वीकारार्हता राजकीय सीमांच्या पलीकडे आहे. आ. चिखलीकर यांनी सर्वच प्रमुख राजकीय पक्षांचा प्रवास केला आहे. सुमारे पाच वर्षे ते भाजपातही होते. त्याकाळात त्यांना देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाबद्दल आपुलकी निर्माण होणे स्वाभाविक आहे. आ. चिखलीकरांच्या विधानांचा गर्भितार्थ लक्षात घेता ते पुन्हा भाजपात प्रवेश करण्याची शक्यता नाकारता येत नाही. पुढील विधानसभा निवडणुकीपूर्वी ते भाजपात परतल्यास 'सिटिंग गेटिंग' समीकरणानुसार लोहा-कंधार विधानसभा मतदारसंघ भाजपला मिळू शकेल. त्यानंतर ते पुन्हा भाजपचे सक्रिय लोकप्रतिनिधी म्हणून कार्यरत असतील. भविष्यात आ. चिखलीकर यांच्या भाजप प्रवेशानंतर राष्ट्रवादीतील सध्याची बहुतांश मंडळी पुन्हा भाजपात कार्यरत होईल, असाही विश्वास अमरनाथ राजूरकर यांनी व्यक्त केला आहे




## चला संकल्प करूया! निसर्ग संवर्धन करूया!

दैनिक युवक आधार
पनवेल वार्ताहर

जगभरामध्ये ५ जून रोजी जागतिक पर्यावरण दिन दरवर्षी साजरा केला जातो. १९७३ मध्ये पहिल्यांदा जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.दरवर्षी 143 होऊन अधिक देशांचा सहभाग असतो. यामध्ये व्यवसाय गैर सरकारी संस्था समुदाय सरकार आणि ख्यातनाम व्यक्तीचा पर्यावरण करण्याचे समर्थन करण्यासाठी एक थीम आणि मंच प्रदान केला गेला आहे.

पर्यावरण संरक्षणासाठी आणि संवर्धनासाठी या दिवशी वेगवेगळे पर्यावरण विषयक जागरूकता आणि कृती कार्यक्रम आयोजित केले जातात. जागतिक पर्यावरण दिवस पर्यावरण सकारात्मक आणि नकारात्मक परिणाम दिसून येतात हा दिवस पर्यावरणाचे रक्षण आणि संवर्धन करण्याच्या आपल्या



जबाबदाऱ्यांनी आपल्याला जाणीव करून देते.

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आपण आपल्या घरातूनच सुरुवात करूया. निकाल. टाकाऊ पासून टिकाऊ वस्तू तयार करणे. निसर्गापासून औषध तयार करणे, प्लास्टिक ऐवजी कागदी पिशव्या वापरूया, पेपर काचेच्या वस्तू अल्युमिनियम अशांची पुनर्निर्मिती करूया, गरज नसल्यास घरातील इलेक्ट्रिक वस्तू टीव्ही बल्ब इत्यादी वस्तूंचा वापर योग्य पद्धतीने करूया अशा विविध मोहिमा राबवून आपण पर्यावरण वाचवण्यासाठी जनजागृती करूया.

सांडपाण्यामुळे नद्यांचे प्रदूषण होत असल्याने त्या विषारी बनत आहेत त्या ठिकाणी पाणी शुद्धीकरणाची यंत्रणा उभारणे आवश्यक आहे. अशा सर्व मोहिमा राबवूया आणि या माध्यमातून जनजागृती करूया.

वाढती लोकसंख्या लक्षात घेता जमिनीची गुंठेवारी ही कमी झाली आहे व उत्पन्नात घट झाली आहे. त्यामुळे येणाऱ्या भविष्यकाळात अन्नधान्याची कमतरता ही भासू शकते.

यावर्षी जागतिक तापमान दरवर्षीपेक्षा जास्त असल्यामुळे देशात अनेक ठिकाणी उष्माघातामुळे जीवित हानी झाली आहे. जागतिक लोकसंख्येच्या मानाने दरवर्षी वृक्षारोपण कमी प्रमाणात होत आहे त्यामुळे मानवाला नैसर्गिक आपत्तीला तोंड द्यावे लागत आहे.

मानवाने नद्या, डोंगर, टेकड्या यासारख्या वर अतिक्रमण केले आहे.याचा परिणाम आपणास उन्हाळ्यात दिसून आला. त्यामुळे पर्यावरण संरक्षणासाठी व संवर्धनासाठी आपण जागरूक असणे गरजेचे आहे. येणाऱ्या भविष्यकाळात जीवनाची परिस्थिती किती बिकट होईल हे पाहता त्यासाठी बीजेरोपण, झाडे लावा झाडे जगवा यासारखे उपक्रम राबवून पुढील धोका टाळण्याचे आजच कार्य केले आहे. आपल्या मातेसमान पृथ्वी आहे आणि तिच्या पर्यावरणाची काळजी आपणच घेतली पाहिजे अन्यथा.

पत्रकार- अमोल पाटील
उपसंपादक-शिवधर्म पेपर
रायगड जिल्ह्य उपाध्यक्ष
राष्टीय पुरोगामी पत्रकार

## राळेगाव पंचायत समिती चे शिक्षण विस्तार अधिकारी नवनाथ लहाने यांची प्रभारी गटशिक्षणाधिकारी म्हणून नियुक्ती

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**



राळेगावः- पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी यवतमाळ जिल्हा परिषदे अंतर्गत येणाऱ्या राळेगाव येथील कार्यरत शिक्षण विस्तार अधिकारी नवनाथ लहाने यांची नियुक्ती करण्यात आली आहे.या अगोदर या पंचायत समिती चे गटशिक्षणाधिकारी या पदाचा अतिरिक्त प्रभार वडकी जिल्हा परिषद हायस्कूल चे मुख्याध्यापक राजू काकडे यांच्याकडे होता.गेल्या काही वर्षापासून राळेगाव पंचायत समितीच्या शिक्षण विभागाने अनेक चढउतार अनुभवले,शिक्षण विभागाची सकारात्मक ऊर्जा सुस्पष्टता, शिस्त, सहकार्य आणि विश्वासाचा नवा पर्व तयार झाला.तसेच काकडे साहेबाचे विचार स्पष्ट निर्णय, विवेक पूर्ण आणि कृती सदैव मूल्य आधी त्यांनी प्रशासकीय जबाबदाऱ्या पार पाडताना नुसत्या शिस्तबद्धपणा जपला नाही तर प्रत्येक शिक्षकाच्या मनाशी एक प्रेमाचं विश्वाचं नातं निर्माण केलं,कुठलाही निर्णय घेताना सर्वांचा विचार संवाद आणि सहमती हे तीन स्तंभ त्यांचं आधारभूत तत्त्वज्ञान होतं ,कणकर निर्णय क्षमता अत्यंत जटिल परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याची त्यांची शैली प्रेरणादायी होती , नियोजन वेळेचा व्यवस्थापन बैठकाचा अचूक आयोजन आणि कागदपत्रे पालन याबाबतीत ते आदर्श ठरले, त्याचप्रमाणे पंचायत समिती राळेगाव येथे कोणताही शिक्षक रिकामा फिरताना दिसला नाही कामानिमित्त शिक्षक हा पंचायत समितीमध्ये दिसले त्याचप्रमाणे नवनियुक्त प्रभारी गटशिक्षणाधिकारी राळेगाव नवनाथ जी लहाने यांनी सुद्धा ती शिस्तबद्धता नियमाचे पालन व शिक्षकांना कोणत्याही कामानिमित्त बोलावणे व मुलाच्या शिक्षणाकडे लक्ष देण्यास सांगणे व व्यवस्थित नियोजन करणे अशी सर्व शिक्षकाची व सर्व तालुक्यातील शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष सदस्य व पालक वर्गाची विनंती आहे.आपल्या नेतृत्वाखाली राळेगाव तालुक्यातील शिक्षण क्षेत्रात निश्चितच नवे विक्रम प्रस्थापित होतील असा जनतेला शिक्षक रुंदाला व पालक वर्गाला तसेच विद्यार्थ्याला विश्वास आहे हे मात्र विशेष

## ज्येष्ठ नागरिक महिलेच्या गळ्यातील दागिने खेचून दोघेजण पसार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : एका ज्येष्ठ नागरिक महिलेच्या गळ्यातील दागिने खेचून दोघे जण पसार झाल्याची घटना पनवेल शहरात घडली आहे. सुषमा पाटील (65) या मिडलक्लास हौसिंग सोसायटी परिसरात फिरत असताना त्यांच्या गळ्यात असलेली सोन्याची चेन व सोन्याचे मणी वाटी असलेले मंगळसूत्र असा जवळपास 75 हजार रुपये सोन्याचा ऐवज मोटार सायकलवरुन आलेल्या दोन अज्ञात इसमांनी खेचून पोबारा केला आहे. याबाबतची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

## लाखो रुपये किंमतीच्या सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
नेवाळी येथील घरात अज्ञात चोरट्याने पाठीमागील दरवाजाची कडी तोडून प्रवेश केला आणि घरातील साडेअकरा तोळे वजनाच्या सोन्याच्या दागिन्यांची घरफोडी केली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रमोद दशरथ खांडेकर हे नेवाळी, पनवेल येथे राहत असून त्यांच्या घरातील सर्वजण गावातील नातेवाईकांच्या उटण्याच्या कार्यक्रमासाठी गेले होते. त्यांनी दरवाजाला कुलूप लावला होता. कार्यक्रम संपल्यानंतर त्यांचे वडील घरी आले असता त्यांनी मुख्य दरवाजा उघडला असता दरवाजा आतून बंद असल्याचे जाणवले. त्यामुळे ते पाठीमागील दरवाजाकडे गेले असता पाठीमागचा दरवाजा उघडा असल्याचे दिसून आले. यावेळी प्रमोद खांदेकर व त्यांची पत्नी मुलासह ते घरी पोहोचले. त्यांनी आत मध्ये जाऊन पाहिले असता लोखंडी कपाटाचा दरवाजा उघडा दिसला. आणि बेडवर सोन्याचे दागिने ठेवण्यासाठीचे बॉक्स पडलेले होते. चोराने त्यांच्या घरात प्रवेश करून आठ तोळे वजनाची सोन्याची गंठण, सोन्याचा चोकर, चैन, अंगठी, टोंगल, रिंग, कुडी असे एकण साडेअकरा तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

## ट्रेलरची मोटरसायकलला धडक; 1 ठार 1 जखमी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
ट्रेलरने मोटरसायकलला धडक दिल्याने शिवराम म्हात्रे (50) यांच्या पोटावरून ट्रेलरचे चाक गेल्याने त्यात त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी ट्रेलर क्रमांक एम एच 46 बीएफ 9725 वरील चालकाविरोधात पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. किरण कृष्णा भोपी (राहणार कोन) यांच्या वडिलांच्या सेवानिवृत्त कार्यक्रमानिमित्त शिवराम म्हात्रे आणि संध्या शिवराम म्हात्रे ( राहणार वयाल, वाशिवली, खालापूर) हे दोघेही मोटरसायकल वरून आले होते. कार्यक्रम संपवून रात्री नऊच्या सुमारास हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल क्रमांक एम एच 46 व्ही 2201 वरून परत जात असताना नाईट रायडर बारच्या समोर कोन गाव येथे आले. यावेळी ट्रेलर क्रमांक एम एच 46 बीएफ 9725 वरील चालकाने ट्रेलर भरधाव वेगाने चालवला आणि मोटरसायकलला धडक दिली. या धडकेत संध्या म्हात्रे या रस्त्याच्या कडेला पडून जखमी झाल्या तर शिवराम नारायण म्हात्रे यांच्या पोटावरून ट्रेलरचे चाक गेले आणि त्यात ते गंभीर जखमी होऊन त्यांचा मृत्यू झाला. या अपघाताप्रकरणी पनवेल तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस अधिक तपास करत आहेत.

## लग्नाच्या आमिषाने तरुणीवर अत्याचार

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
लग्नाचे आमिष दाखवून तीन वर्षांपूर्वी पळवून नेलेल्या तरुणीशी लग्न न करता तिच्यासोबत लिव्ह इन , रिलेशनशीपमध्ये राहिलेल्या तरुणाने तिला सोडून पलायन केल्याची घटना उघडकीस आली आहे. तळोजा पोलिसांनी या प्रकरणातील पीडित तरुणीच्या तक्रारीवरून आरोपी तरुणाविरोधात अपहरणासह बलात्काराचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेतील 23 वर्षीय पीडित तरुणी तळोजा येथे राहण्यास असून तिच्यासोबत राहणारा 28 वर्षीय किरण हा तरुण बीड जिह्यातील आहे. चार वर्षांपूर्वी किरण तळोजा भागात राहण्यासाठी आला असताना, पीडित तरुणी व किरण या दोघांमध्ये प्रेमसंबध निर्माण झाले होते. त्यावेळी आरोपी किरणने पीडित तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून तिला तळोजा गावातून पळवून नेले होते. त्यानंतर हे दोघेही लग्न न करता लिव्ह इन रिलेशनशिपमध्ये राहत होते. त्यांना दोन वर्षांपूर्वी एक मुलगीही झाली. त्यानंतर हे दोघेही तळोजामध्ये राहत असताना किरणने काही दिवसांपूर्वी पीडित तरुणीला व दोन वर्षीय मुलीला इथेच सोडून आपल्या मूळ गावी पलायन केले. या प्रकारानंतर पीडित तरुणीने किरणच्या बीड येथील मूळ गावी धाव घेतली. मात्र त्याच्या कुटुंबियांनी तिला स्वीकारण्यास नकार दिल्यानंतर त्यांच्यामध्ये भांडण झाले. पीडित तरुणीला यावेळी रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यानंतर बीड पोलिसांनी पीडित तरुणीचा जबाब नोंदवून घेत तिचा स्वीकार न करणाऱ्या आरोपी किरणविरोधात अपहरण आणि बलात्काराचा गुन्हा दाखल केला.

## फेसबुकवरील मैत्रिणीची भुरळ; ट्रेडिंगमध्ये गमावले 41 लाख

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)** : फेसबुकवरून मैत्री वाढवून सायबर गुन्हेगारांनी महिलेच्या नावे एकाची 41 लाख 82 हजारांची फसवणूक केली आहे. आपण ट्रेडर असल्याचे सांगून या महिलेने त्यांना एका लिंकवर पैसे गुंतविण्यास सांगितले होते. तिच्यावर विश्वास ठेवून ऑनलाईन पैसे पाठविल्यानंतर या व्यक्तीला फसवणूक झाल्याचे लक्षात आले. पनवेल परिसरातील 35 वर्षीय व्यक्तीसोबत हा प्रकार घडला आहे. गतवर्षी त्यांना एका महिलेने फेसबुकवर फ्रेंड्स रिक्वेस्ट पाठवली होती. या सायबर गुन्हेगारांनी महिलेच्या नावे गंडविले, पोलिस पनवेल शहर ठाण्यात गुन्हा दाखल, पोलिसांकडून तपास सुरू व्यक्तीने तिच्या मैत्रीचा स्वीकार करताच तिच्या मागणीवरून या व्यक्तीने त्याचा मोबाईल नंबर तिला दिला होता. त्यानुसार दोघांमध्ये अनेक दिवस चॅटिंगद्वारे गप्पा सुरु होत्या. यादरम्यान आपण ट्रेडर असून, एका कंपनीसाठी काम करत असल्याचे या महिलेने सांगितले. तर या व्यक्तीला देखील ट्रेडिंगमधून पैसे कमावण्याची इच्छा होती. त्यामुळे महिलेच्या सांगण्यावरून त्यांनी टप्प्याटप्प्याने एकूण 41 लाख 82 हजार रुपये ऑनलाईन गुंतवले होते. मात्र त्याचा मोबदला त्यांना मिळाला नाही. शिवाय मैत्रिणीनेही संपर्क 'तोडला. त्यानंतर त्यांनी पोलिसांकडे तक्रार केली.

## 25 हजारांची फसवणूक

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**
अर्ध्या किमतीत लॅपटॉप विकत देतो सांगून एकाची 25 हजारांची फसवणूक करण्यात आली आहे. तळोजा येथील मानकसिंग राजपुरोहित यांच्यासोबत हा प्रकार घडला. त्यांनी सीबीडी येथे ओळख झालेल्या वसीम शेख याला ही रक्कम दिली होती. शेख याने तो विजय सेल्समध्ये मॅनेजर असल्याचे सांगून 50 हजारांचा लॅपटॉप 25 हजारांत मिळवून देतो, असे सांगून पैसे घेऊन त्यांची फसवणूक केली. याप्रकरणी सीबीडी पोलिस ठाण्यात वसीम शेख विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# 'फॉर्च्युन इन्फ्लुएन्सर मास्टरक्लास' चे टॉप 25 विजेते घोषित

## विजेत्यांना फॉर्च्युन फूड्ससोबत कंटेंट कोलॅबोरेशनची संधी

**दैनिक युवक आधार**
**मुंबई, प्रतिनिधी** : एडब्ल्यूएल ॲग्री बिझनेस लिमिटेड (पूर्वीचे अदानी विल्मर लिमिटेड) चा प्रमुख ब्रँड फॉर्च्युन फूड्सने या वर्षी 10 फेब्रुवारी रोजी त्यांचा 'फॉर्च्युन इन्फ्लुएंसर मास्टरक्लास' हा डिजिटल उपक्रम सुरू केला. या उपक्रमातील टॉप २५ विजेत्यांसाठी एका खास मीट अँड ग्रीट कार्यक्रमासह त्यांचा २५ वा वर्धापन दिन थाटात साजरा केला. या उपक्रमाला जबरदस्त प्रतिसाद मिळाला. भारतातील पाककृती क्षेत्रात येऊ इच्छिणाऱ्या उदयोन्मुख इन्फ्लुएन्सर्सकडून ५०,००० हून अधिक नोंदणी झाली.अहमदाबादमध्ये झालेल्या सत्कार कार्यक्रमात, टॉप २५ विजेत्यांना सन्मानित करण्यात आले आणि प्रत्येक विजेत्याला फॉर्च्युन फूड्ससह ₹२ लाखांपर्यंत कंटेंट सहकार्याची संधी देण्यात आली. फॉर्च्युन इन्फ्लुएंसर मास्टरक्लासने केवळ अपवादात्मक प्रतिभाच शोधून काढली नाही तर घरगुती



पाककृती इन्फ्लुएन्सर्सच्या नवीन पिढीचा पायाही घातला आहे. या सर्वांना साधने उपलब्ध करून देण्यासोबतच आणि त्यांचे कौशल्य प्रदर्शित करण्यासाठी एक सहाय्यक ब्रँड प्लॅटफॉर्म मिळाला आहे. मेघना फूड मॅजिकच्या मेघना कामदार ५ दशलक्षांहून अधिक मेटा फॉलोअर्ससह फोर्ब्सच्या टॉप १०० डिजिटल स्टार, लॉस्ट अँड हंग्री स्टुडिओजचे सर्जनशील विनायक ग्रोव्हर आणि इन्फ्लुएंसर मॅनेजर निमिषा राव यासारख्या प्रसिद्ध खाद्य प्रभावकांकडून या सहभागींना महत्त्वाचे मार्गदर्शन लाभले.

जवळजवळ चार महिने वेगवेगळ्या पातळ्यांवर मूल्यांकन करून सुरुवातीला पहिल्या टॉप २५० पाककृती निर्मात्यांची निवड केली. या सर्व असाइनमेंटचे मूल्यांकन मास्टरशेफ विजेते आणि स्पर्धकांसह एका प्रतिष्ठित पॅनेलद्वारे केले गेले. या असाइनमेंटचे मूल्यांकन करण्यासाठी रेसिपी सर्जनशीलता आणि कथाकथन क्षमता ते व्हिडिओ एडिटिंग, प्लेटिंग सौंदर्यशास्त्र, ॲनिमेशनचा वापर अशा प्रगत कौशल्यांचे निकष होते. त्यानंतरच्या फेऱ्यांमध्ये ही संख्या टॉप २५ पर्यंत आली. त्यांनाच मीट अँड ग्रीट कार्यक्रमात सन्मानित करण्यात आले. या दिमाखदार अंतिम सोहोळ्याची सुरुवात मनोरंजक खेळ आणि विविध उपक्रमांनी झाली. मेघना कामदार यांनी व्यवसायाला आवश्यक गोष्टींची माहिती देताना एक विशेष प्लेटिंग डेमो यावेळी दिला. तर संध्याकाळचे मुख्य आकर्षण ठरले ते 'द इंग्रिडिअन्स ऑफ अ ग्रेट फूड कंटेंट क्रिएटर' या शीर्षका अंतर्गत आयोजित केलेला एक आगळावेगळा चॅट शो. या चॅटमध्ये इन्फ्लुएंसर पक्षाचे प्रतिनिधित्व मेघना कामदार यांनी केले. तर ब्रँड पक्षाकडून विक्री आणि विपणन एडब्ल्यूएल ॲग्री बिझनेस लिमिटेडचे संयुक्त अध्यक्ष मुकेश मिश्रा तर डिजिटल एजन्सीच्या बाजूने सोशल बीटचे सह-संस्थापक सुनील चावला यांनी आपले वेगवेगळे दृष्टिकोन मांडले. या माध्यमातून त्यांनी प्रेक्षकांचे प्रबोधन केले. श्री मुकेश मिश्रा, जॉइंट प्रेसिडेंट, सेल्स-मार्केटिंग, एडब्ल्यूएल ॲग्री बिझनेस लिमिटेड म्हणाले,"आमचा असा ठाम विश्वास आहे की, क्रिएटर पार्टनरशिप साध्या जाहिरातींपलीकडे गेली पाहिजे - ती शिक्षण, सक्षमीकरण आणि समुदाय-निर्माणासाठी अर्थपूर्ण साधने म्हणून कार्यरत झाली पाहिजे. आमच्या २५ वर्षांच्या उत्सवाचा भाग म्हणून सुरू झालेल्या 'फॉर्च्युन इन्फ्लुएंसर मास्टरक्लास' द्वारे आम्हाला हा विश्वास प्रत्यक्षात आणता आला. या महत्त्वाच्या टप्प्याचा आनंद साजरा करत असताना, आम्हाला एक विश्वासार्ह घरगुती ब्रँड म्हणून आमच्या प्रवासाचा केवळ सन्मानच करायचा नव्हता तर असे काहीतरी करायचे होते जे केवळ तर संपूर्ण भारतातील प्रतिभेला संधी देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतिबिंब आहे." हाराष्ट्रातील बुलडाणा येथील स्नेहल कुलकर्णी स्वतःच्या कामगिरीबद्दल म्हणाली,"मी फॉर्च्युन इन्फ्लुएंसर मास्टरक्लासच्या टॉप 25 विजेत्यांपैकी एक नव्हते तोवर माझ्या वडिलांसाठी, सोशल मीडियासाठी फूड कंटेंट तयार करणे हा माझा फक्त छंद होता. मात्र, या क्षणाने आम्हा दोघांसाठी सर्वकाही बदलले. आता ते माझ्या आवडीला एक करिअर म्हणून पाहतात, फक्त एक छंद नाही तर मला प्रोत्साहन देतात, हे सर्व फॉर्च्युनकडून मिळालेल्या या संधीमुळेच."

## जे प्राईम बिल्डकॉनची बिझनेस मीट, संकल्प 2025 मुंबई 3.0 च्या विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात

**जे प्राईम बिल्डकॉनची बिझनेस मीट, संकल्प 2025 मुंबई 3.0 च्या विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**
जे प्राईम बिल्डकॉन, परवडणाऱ्या घरांच्या क्षेत्रात वेगाने प्रगती करणाऱ्या ब्रँड्सपैकी एक असून यांनी नुकतीच त्यांची भव्य बिझनेस मीट 'संकल्प 2025' आयोजित केली. या कार्यक्रमात 200 हून अधिक टॉप चॅनल पार्टनर्स आणि नवी मुंबईतील पाहुण्यांनी सहभाग घेतला. भागीदारी, एकत्रित दृष्टीकोन आणि नव्या मुंबईच्या विकासात सामूहिक योगदान या हेतूने हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण ठरले दिलीप औटी यांचे स्फूर्तिदायक व अनुभवसंपन्न मार्गदर्शन. आंतरराष्ट्रीय बिझनेस स्ट्रॅटेजिस्ट आणि कोच म्हणून त्यांचा अनुभव आणि एमएसएमई, प्रोफेशनल्स व रिअल इस्टेट क्षेत्रासाठी त्यांनी दिलेले विचार जे प्राईम बिल्डकॉनच्या पीपल फर्स्ट दृष्टिकोनाशी सुसंगत होते. कार्यक्रमाला मराठी चित्रपट व मालिकांतील लोकप्रिय अभिनेत्री जान्हवी किल्लेकर आणि सेलिब्रिटी अँकर, कॉमेडी तडका फेम अभिनेता ओम यादव उपस्थित होते. कार्यक्रमाचा मुख्य क्षण ठरला जे प्राईम बिल्डकॉनचे एम.डी. अविनाश जगदाळे यांचे प्रेरणादायी भाषण. त्यांनी



'मुंबई 3.0' या नव्या शहर विकास संकल्पनेबद्दल आपली भूमिका मांडली, जे महाराष्ट्रासाठी अधिक स्मार्ट, आधुनिक आणि सुसंगत भविष्याकडे एक धोरणात्मक पाऊल आहे. त्यांनी विशेषतः पुष्पक नगर परिसराची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अटल सेतू यांच्या नजीक असलेल्या या भागात येत्या काळात गुंतवणूक, पायाभूत सुविधा व जीवनशैलीत मोठे बदल घडतील, असे ते म्हणाले. कार्यक्रमात जे प्राईम बिल्डकॉनने मागील वर्षात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या चॅनल पार्टनरला पारितोषिक देऊन सन्मानित केले. तसेच, अरिवली, गिरवले आणि आष्टे या एमएसआरडिसी अंतर्गत येणाऱ्या ठिकाणी जे प्राईम बिल्डकॉनचे आगामी टाउनशिप प्रकल्प लवकरच सुरू होणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले, जे भविष्यातील आधुनिक, नियोजित शहरांच्या दिशेने एक पाऊल आहे.

## महावितरण तर्फे गुरुवारी लासलगाव उपविभाग येथे निबंध व चित्रकला स्पर्धेचे आयोजन

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**
विंचुर :-महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त राज्यभरात 01 ते 06 जून 2025 दरम्यान विद्युत सुरक्षा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. याच कार्यक्रमाचा भाग म्हणून लासलगाव उपविभागा अंतर्गत लासलगाव उपविभाग महावितरण व कर्मवीर भाऊराव पाटील शाळा व कनिष्ठ महाविद्यालय विंचूर यांचे संयुक्त विद्यमाने गुरुवारी दिनांक 5 जून 2025 रोजी सकाळी 10 ते 11 वाजता निफाड तालुक्यातील शालेय विद्यार्थी व महावितरण कर्मचारी पाल्यांसाठी *विद्युत सुरक्षितता* या विषयावर चित्रकला व निबंध स्पर्धेचे आयोजन करण्यात आलेले आहे. "आम्ही सुरक्षेचे शिल्पकार, शून्य विद्युत अपघाताने करू महावितरणचे ध्येय साकार" हे या स्पर्धेचे ब्रीद आहे. सदर स्पर्धा कर्मवीर भाऊराव पाटील शाळा व कनिष्ठ महाविद्यालय विंचूर तालुका निफाड, येथे होणार असून स्पर्धेसाठी कोणतेही शुल्क नाही. स्पर्धेत प्रथम तीन क्रमांक प्राप्त करणाऱ्या स्पर्धकांना विविध बक्षीसे व सर्व स्पर्धकांना प्रमाणपत्र यांचे वाटप करण्यात येणार आहे. निफाड तालुक्यातील पहिली ते दहावी इयत्तेतील जास्त जास्त




विद्यार्थ्यांनी सदर स्पर्धेत सहभाग नोंदवावा असे आवाहन कार्यकारी अभियंता श्री. केशव काळुमाळी व प्रभारी उपकार्यकारी अभियंता श्री किरण काकड यांनी केले आहे. सदर स्पर्धेसाठी आयोजकांकडून ड्रॉइंग पेपर व अखीव पेपर पुरविण्यात येईल.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर वारंवार अत्याचार..

### आमखेड्याच्या आर्मी जवानावर गुन्हा दाखल.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**
**वाशिम.-** 25 वर्षीय तरुणीला लग्नाचे आमिष दाखवून शारीरिक संबंध ठेवणाऱ्या आणि नंतर लग्नास नकार देणाऱ्या आर्मी जवानाविरोधात वाशिम शहर पोलिसांनी गंभीर स्वरूपाचा गुन्हा दाखल केला आहे. महेंद्र महादेव ताजने.( रा.आमखेडा तालुका मालेगाव जिल्हा वाशिम.) असे आरोपी जवाणाचे नाव असून त्याच्यावर भारतीय न्याय संहिता 2023 अंतर्गत कलम 351.(2) 351.(3)352. आणि 69. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रेम फसवणूक आणि अत्याचाराची शोकांतिका. सदर पीडित मुलगी शिक्षणानंतर पोलीस भरतीसाठी जय भारत करिअर अकॅडमीत तयारी करत होती. त्याच दरम्यान आरोपी महेंद्र ताजने यांच्याशी ओळख झाली. दोघांचे प्रेम संबंध सुरू झाले. आणि आरोपीने लग्नाचे आश्वासन दाखवत शारीरिक संबंध ठेवले. या संबंधाची सुरुवात 2023 साली झाली. आरोपीची अग्निवीर म्हणून आर्मीमध्ये निवड झाल्यानंतरही त्याने लग्नाचे आमिष दाखवून विविध ठिकाणी तरुणी सोबत




शारीरिक संबंध ठेवले. रात्रीच्या वेळेस रूमवर नेऊन जबरदस्ती केली. तक्रारदार महिलेच्या म्हणण्या नुसार एकदा वाशीम येथील अकोला नाका परिसरातून आरोपीने तिला मोटरसायकल वर बसून तिला एका ओळखीच्या रूमवर नेले. आणि त्याचे लग्नाचे आमिष आश्वासन देत तिच्यावर जबरदस्ती केली. अशा अनेक घटना वारंवार घडत राहिल्या. मात्र 2025 मध्ये तर. आरोपी पीडित मुलीच्या घरीही आला होता. आणि घरच्या समोर लग्नाचे आश्वासन दिले होते. लग्नास नकार आणि धमक्या. परंतु त्यानंतर त्याने अचानक संपर्क तोडला. तरुणीने त्याच्या घरी जाऊन विचारणा केली असता आरोपीच्या वडिलांनी तिला मारहाण करून तिचा मोबाईल फोडला. या संदर्भात जऊळका

या प्रकरणात पीडितेला न्याय मिळवून देण्यासाठी वज्रदेवी महिला विकास संघाच्या कु. आरती संतोष ठोके. यांनी मोलाची भूमिका बजावली. पीडितेच्या तोंडी निवेदनाच्या आधारे त्यांनी प्रकरणाचे गांभीर्य ओळखले. व तातडीने पुढाकार घेतला. गुन्हा दाखल होईपर्यंत जऊळका पोलीस स्टेशन वाशिम ग्रामीण पोलीस स्टेशन आणि अखेर वाशिम शहर पोलीस स्टेशन पर्यंत पाठपुरावा करत पीडित मुलीला कायदेशीर मदत केली.

पोलीस स्टेशनमध्येही वेगळा अहवाल दिला आहे. आरोपी महेंद्र ताजने याने नंतर तरुणीला लग्नास नकार दिला. आणि तिला जीवे मारण्याची धमकी दिली आणि आरोपीच्या घरी गेल्यानंतर त्या दिवशी सुद्धा आरोपीच्या आईने व आरोपीने वडिलांनी सर्व घरच्यांनी तिला बेदम मारहाण केली. पोलिसांकडून तपास सुरू.2. जून 2025 रोजी पीडीतेच्या तक्रारीनंतर संबंधित वाशिम शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक आडोळे. यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे

## अज्ञात वाहनाची दुचाकीला धडक, दुचाकी चालक गंभीर जखमी

### नॅशनल हायवे क्र ४४ वरील कारेगाव पुलाजवळील घटना

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-**
**जितेंद्र खोडे**
राळेगाव :- अज्ञात वाहनाने दुचाकी चालकाला मागाहून धडक दिल्याने झालेल्या अपघातात दुचाकी चालक गंभीर जखमी झाला,अपघाताची ही घटना दिनांक ४ जून बुधवार रोजी सकाळी



७.३० च्या दरम्यान नॅशनल हायवे क्रमांक ४४ वरील वर्धा नदीच्या पुलाजवळ घडली.योगेश रामराव निकोडे वय २५ वर्ष राहणार सायखेडा तालुका केळापूर असे अपघातात जखमी झालेल्या दुचाकी चालकाचे नाव आहे.योगेश हा आपल्या दुचाकी क्रमांक एम एच ३२ टी ७३५१ ने हिंगणघाट कडून वडकी मार्गे येत होता. दरम्यान नॅशनल हायवे क्रमांक ४४ वरील कारेगाव येथील वर्धा नदीच्या पुलाजवळ अज्ञात वाहन चालकाने त्याच्या दुचाकीला मागाहून जोराची धडक दिली यामध्ये योगेशच्या डोक्याला तोंडाला व हाता पायाला मार लागून तो गंभीर जखमी झाला घटनास्थळावर लगेच एन एच आयची चमू दाखल झाली व जखमीला पुढील उपचारार्थ वडनेर येथे हलविण्यात आले आहे.

## ज्येष्ठ समाजसेवक पद्मभूषण अण्णा हजारे,पद्मश्री बीजमाता राहीबाई पोपरे यांच्या हस्ते प्रदिप पट्टेबहादूर यांना राष्ट्रीय युवा पुरस्कार प्रदान

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी**
**रणजित सिंह ठाकुर**
जून, 2025, सामाजिक कार्यात सदैव अग्रेसर असलेले वाशिम तालुक्यातील केकतउमरा येथील युवा सामाजिक कार्यकर्ते तथा राजा प्रसेनजीत अल्पसंख्यांक शिक्षण बहुउद्देशीय संस्थेचे प्रतिनिधी तथा नेहरू युवा बहुउद्देशीय मंडळाचे अध्यक्ष व मा.राष्ट्रीय युवा कौर माय भारत केंद्र वाशिम भारत सरकार आणि पर्यावरण प्रेमी प्राणी व सर्पमित्र युवाश्री प्रदिप पट्टेबहादूर (जिल्हा युवा पुरस्कार प्राप्त - महाराष्ट्र शासन), यांना पर्यावरण संवर्धन विकास योजना व शासन पर्यटन धोरण 2016 च्या अंतर्गत भारत सरकार नीती आयोग द्वारा प्रमाणित भारत सरकार जनजाती कार्य मंत्रालय, सामाजिक न्याय अधिकारीता मंत्रालय प्रमाणित आय.एस.ओ व शासन मान्यता प्राप्त आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्था राष्ट्रीय पर्यटन विकास व सांस्कृतिक कला महोत्सव संस्था



यांच्या द्वारे आयोजित करण्यात आलेल्या संस्थेच्या 7 व्या वर्धापन दिनानिमित्त राष्ट्रीय पर्यावरण पर्यटन व साहित्य परिषद 2025 चे आयोजन करण्यात आले असून या कार्यक्रमांमध्ये राष्ट्रीय कार्य गौरव पुरस्कार वितरण सोहळ्याचे आयोजन करण्यात आले.यामध्ये वाशिम जिल्ह्यातील केकतउमरा या खेड्या गावातील युवाश्री प्रदिप पट्टेबहादूर यांना सन 2025 चा राष्ट्रीय युवा पुरस्कार उद्घाटक थोर समाजसेवक पद्मश्री पद्मविभूषण डॉ.श्री. अण्णा हजारे,पद्मश्री बीजमाता राहीबाई पोपरे,विशेष अतिथी सेवानिवृत्ती विशेष पोलीस महानिरीक्षक महाराष्ट्र राज्य विठ्ठल जाधव, पोलीस उपअधीक्षक तथा अतिरिक्त विशेष पोलीस दल फॉरेस्ट वन युनिट महाराष्ट्र राज्य श्री. संतोष गायके, आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्था भारत संस्थापक अध्यक्ष देवा तांबे,सुप्रीम कोर्ट बार असोसिएशनचे अध्यक्ष विशाखापटनम एड डॉ. चेन्ना बाबू सरत,राष्ट्रीय अध्यक्ष आंतरराष्ट्रीय मानव अधिकार डॉ. रागिनी चौरे, पुणे शहर पोलीस ज्ञानेश्वर कुंभार,आधार महिला मंडळ संस्थापक अध्यक्ष शाहूनगर सुप्रिया चांदगुडे मॅडम पिंपरी चिंचवड पोलीस वाहतूक शाखा जोशना जांभेकर, महाराष्ट्र राज्य महिला मार्गदर्शिका कृपाताई ठाकरे यांच्या हस्ते व उपस्थितीमध्ये अहिल्यानगर (राळेगणसिद्धी)येथे प्रदान करण्यात आला. मागील दहा ते बारा वर्षा पासून सामाजिक सेवा पर्यावरण वृक्ष संवर्धन वन्यजीव संवर्धन, आपत्ती व्यवस्थापन, शिक्षण, कला, खेळ,महिला सक्षमीकरण, मासिक पाळी, नशा मुक्त भारत, अंधश्रद्धा निर्मूलन, नेतृत्व विकास, आरोग्य व रक्तदान शिबिर,रुग्णसेवा तरुणांच्या सामाजिक सांस्कृतिक शैक्षणिक आणि इतर क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल या संपूर्ण कार्याची दखल घेऊन त्यांना आज 3 जून 2025 रोजी ज्येष्ठ समाजसेवक मा.डॉ. पद्मश्री,पद्मभूषण अण्णा हजारे, बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपेरे, विशेष पोलीस महानिरीक्षक श्री. श्रीधर जाधव,आंतरराष्ट्रीय पर्यावरण मित्र बहुउद्देशीय संस्था भारत संस्थापक आंतरराष्ट्रीय अध्यक्ष श्री.देवा तांबे आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र,गोल्ड मेडल पर्यावरण जनजागृती पिशवी देऊन सन्मानित करण्यात आली.प्रदीप पट्टेबहादूर यांना अत्यंत प्रतिष्ठेचा व मानाचा हा पुरस्कार प्रदान झाल्यामुळे विदर्भासह वाशिम जिल्ह्यात सर्वत्र त्यांचे अभिनंदन व कौतुक होत आहे.

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR (RNI NO :- MAHMAR/2023/89514) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

# कारची धडक, चालक जखमी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, (वार्ताहर)**

चुकीच्या दिशेने आलेल्या कारने दुसऱ्या कारला धडक दिल्याने झालेल्या अपघातात जैनल मतीऊर अब्दिन (रा. सेक्टर 24 उलवे) हे जखमी झाले. या अपघातप्रकरणी कारच्या (क्रमांक एमएस 46-एएक्स 3355) चालकाविरोधात पनवेल शहर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

जैनल हे पहाटे कार (क्रमांक एमएच 01-डब्ल्यू 5304) घेऊन पनवेल ते उलवे जात होते. पहाटे चारच्या सुमारास जेएनपीटी हायवे सीएनजी पंपाच्या विरुद्ध बाजूस हायवेने जात असताना समोरून आलेल्या कारने त्यांच्या कारला धडक दिली. या अपघातात कारचा पुढील भाग डॅमेज झाला असून, जैनल जखमी झाले. तसेच कारमधील प्रवाशांना किरकोळ मार लागला आहे.

## नैना प्रकल्पातील नगररचना परियोजना क्र. ८ ते १२ - लवाद सुनावणीस ३० जून पर्यन्त मुदतवाढ सहभागासाठी सिडकोचे जमीनधारकांना आवाहन

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या प्रभाव क्षेत्रात विशेष नियोजन प्राधिकरण म्हणून सिडकोची शासनामार्फत १० जानेवारी २०१३ रोजी नियुक्ती करण्यात आली आहे. या नियोजन प्रक्रियेचा महत्त्वाचा टप्पा म्हणजे नैना क्षेत्रातील नगररचना परियोजनांची अंमलबजावणी. सदर नैना क्षेत्रात सद्यस्थितीत एकूण १२ नगररचना परियोजना राबविण्यात येत असून, यातील परियोजना क्र. ८, ९, १०, ११ आणि १२ या योजनांसाठी लवादांची सुनावणी अंतिम टप्प्यात आहे. काही जमीनधारक विविध कारणांमुळे याआधीच्या सुनावणीत सहभागी होऊ शकले नाहीत. त्यांना संधी मिळावी म्हणून सिडकोने यापूर्वी ३० मे २०२५ पर्यंत मुदतवाढ दिली होती. लोकप्रतिनिधींनी केलेल्या विनंतीनुसार व हितधारकांचा व्यापक सहभाग सुनिश्चित करण्यासाठी सिडको आता ही सुनावणी अंतिमतः ३० जून २०२५ पर्यंत वाढवत आहे. ही अंतिम मुदत आहे. म्हणूनच सिडको सर्व संबंधित भूधारक, नागरिक आणि हितधारकांना आवाहन करत आहे की, त्यांनी या संधीचा लाभ घेत आपले म्हणणे मांडण्यासाठी आवर्जून उपस्थित राहावे, जेणेकरून या महत्वपूर्ण प्रकल्पात त्यांचा सक्रिय सहभाग आणि हितसंपादन होऊ शकेल. सुनावणीसाठी कृपया आवश्यक कागदपत्रांसह कार्यालयीन वेळेत – सकाळी ११ ते संध्याकाळी ५ दरम्यान – सिडको नैना कार्यालय, टॉवर क्रमांक १०, ७ वा मजला, रेल्वे स्थानक संकुल, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे संपर्क साधावा.

# साडेअकरा तोळे सोन्याच्या दागिन्यांची चोरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : नेवाळी येथील घरात अज्ञात चोरट्याने पाठीमागील दरवाजाची कडी तोडून प्रवेश केला आणि घरातील साडेअकरा तोळे वजनाच्या सोन्याच्या दागिन्यांची घरफोडी केली. या प्रकरणी खांदेश्वर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. प्रमोद दशरथ खांडेकर हे नेवाळी, पनवेल येथे राहत असून दोन जून रोजी रात्री आठच्या सुमारास त्यांच्या घरातील सर्वजण गावातील नातेवाईकांच्या उटण्याच्या कार्यक्रमासाठी गेले होते. त्यांनी दरवाजाला कुलूप लावला होता. कार्यक्रम संपल्यानंतर त्यांचे वडील घरी आले असता त्यांनी मुख्य दरवाजा उघडला असता दरवाजा आतून बंद असल्याचे जाणवले. त्यामुळे ते पाठीमागील दरवाजाकडे गेले असता पाठीमागचा दरवाजा उघडा असल्याचे दिसून आले. यावेळी प्रमोद खांदेकर व त्यांची पत्नी मुलासह ते घरी पोहोचले. त्यांनी आत मध्ये जाऊन पाहिले असता लोखंडी कपाटाचा दरवाजा उघडा दिसला. आणि बेडवर सोन्याचे दागिने ठेवण्यासाठीचे बॉक्स पडलेले होते. चोराने त्यांच्या घरात प्रवेश करून आठ तोळे वजनाची सोन्याची गंठण, सोन्याचा चोकर, चैन, अंगठी, टोंगल, रिंग, कुडी असे एकण साडेअकरा तोळे वजनाचे सोन्याचे दागिने चोरून नेले.

## चिपळूणमधील कळंबस्ते येथे गुरुवारी'देवराई' चा शुभारंभ

**दैनिक युवक आधार**
**रत्नागिरी, (जिमाका)**

गुरुवार 5 जून जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून चिपळूण तालुक्यातील कळंबस्ते रेल्वे फाटक जवळ सकाळी 8 वाजता देवराई वृक्ष लागवडीचा शुभांरभ करण्यात येणार आहे. नागरिकांनी वृक्षलागवड व श्रमदानासाठी उपस्थित रहावे, असे आवाहन प्रांताधिकारी आकाश लिगाडे यांनी केले आहे. यावेळी 149 प्रजातींच्या 1 हजार 252 वृक्षांचे रोपण करण्यात येणार आहे. अत्याधिक कार्बन उत्सर्जनामुळे होणारी जागतिक तापमान वाढ आणि त्यातून होणारे अवकाळी पाऊस, अतिवृष्टी, दुष्काळ, पूर, चक्रीवादळे इत्यादी स्वरूपातील वातावरणीय बदल ग्रामीण भागावर गंभीर परिणाम करीत आहेत. या पर्यावरणाच्या संकटाला तोंड देण्यासाठी मोठ्या प्रमाणावर वृक्षारोपणाद्वारे वातावरणातील कर्बवायू शोषून घेणे आवश्यक आहे. यासाठी तसेच जैवविविधतेचे जतन करण्यासाठी देवराया व घनवने तयार करणे हा प्रभावी उपाय आहे. राज्यात मानवनिर्मित देवराया व घनवने तयार करण्यासाठी शासनाने वनीकरण क्षेत्रात अनुभव असणाऱ्या देवराई फाउंडेशन, पुणे या संस्थेद्वारे राज्यातील प्रत्येक तालुक्यामध्ये किमान एक मानवनिर्मित देवराई व घनवन तयार करण्यात येणार आहे. देवराई उभारण्यासाठी लागणारी तांत्रिक माहिती व रोपे देवराई फाउंडेशनमार्फत पुरवण्यात येणार आहेत.

# मालेगाव तहसीलदारांना तहसील कार्यालय मालेगाव या नावाचा पडला विसर. नावाचा गेला कलर.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील.**

वाशिम जिल्ह्यात मालेगाव तालुक्यात तहसील कार्यालय मालेगाव येथे दैनिक युवक आधारचे उपजिल्हा प्रतिनिधी गजानन पवार पाटील यांनी केले तहसील कार्यालय मालेगाव चे स्टिंग ऑपरेशन तहसीलदार मालेगाव यांना तहसील कार्यालय मालेगाव या नावाचा पडला विसर. या नावाचा गेला कलर तहसील कार्यालय मालेगाव हे नाव अद्याप सामान्य जनतेला ओळखू येत नाही आणि बाहेरून येणाऱ्या नागरिकांना नेमकं तहसील कोणत आहे की पार्टी सुद्धा नाही. सामान्य जनतेने नेमकं काय समजायचं कोंडवाडा आहे की तहसील कार्यालय मालेगाव तहसील मध्ये लाखो लोक विविध शासकीय कामासाठी ये जा करतात कोणाचे शेतीचे काम असते तर पुरवठा विभाग आहे संजय गांधी विभाग




आहे अक्षरशः संजय गांधी विभागांमध्ये तर सामान्य जनतेला ताटकळत बसावे लागते वयोवृद्ध अबालवृद्ध आजी आजोबा यासारखे लोक त्यांच्या संजय गांधी विभागांमध्ये 3 जून रोजी 12.35. मिनिटाला ताटकळत बसून होते तर तसेच दुसऱ्या मजल्यावर जाते वेळेस अक्षरशः त्या पायऱ्याजवळ घाणच घाण आहे अक्षरशा लोक थुंकतात त्यानंतर सामान्य जनतेला टॉयलेट बाथरूम या गोष्टी इमर्जन्सी लागल्या तर तिथे तर घाणच घाण आहे हात धुवायचे बेसिन सुद्धा बंद पडेल आणि त्यामध्ये घाणच घाण आहे. आणि सामान्य लोकांनी पिण्याचा पाण्याचा प्रश्न केला तर तहसील मध्ये पाणी फिल्टर आहे परंतु तिथे पाणी पिणे ऐवजी तिथे हात धुवायची सुद्धा माणसाची इच्छा होत नाही तिथे एवढी घाण आहे की माणसाला उलट्या होतील मालेगाव तहसील मधील या घाणीचा सर्व प्रकार दैनिक युवक आधार चे उपजिल्हा प्रतिनिधी गजानन पवार पाटील यांच्या कॅमेरात कैद झाला आहे. तसेच तहसील कार्यालयाची जुनी इमारत त्याच्या बाजूला पिण्याच्या पाण्याची टाकी आहे सध्या ती टाकी बंद आहे त्यामध्ये पाणी नाही आणि नळ सुद्धा नाही आणि त्या टाकी खाली सेतू केंद्र आहे त्या सेतू केंद्रावाल्याला नेमका कोणाचा आशीर्वाद असा सवाल सामान्य जनतेने उपस्थित केला आहे. तसेच तहसील कार्यालयामध्ये लाखो लोक विविध कामासाठी ये जा करतात. तर आजूबाजूला गवत छोटी छोटी झाडे वाढली आहेत याकडे नायब तहसीलदार पुरवठा तहसीलदार व तहसीलदारांचे दुर्लक्ष. कारण ही सगळी घाणच घाण खालच्या मजल्यावर आहे. सामान्य जनतेने नेमकं काय समजायचं कोंडवाडा आहे की तहसील कार्यालय.

तसेच दैनिक युवक आधारच्या प्रतिनिधींनी तहसील कार्यालयाच्या दुसऱ्या मजल्यावर सुद्धा स्टिंग ऑपरेशन केले तर तिथे स्वच्छता आढळून आली.. तिथे सुद्धा कृषी विभाग आहे वन विभाग आहे बाकी बरेच काही ऑफिस आहेत तिथे सुद्धा वरिष्ठ अधिकारी कर्मचारी आहेत तर खालच्या मजल्यावर सुद्धा तहसीलदार नायब तहसीलदार पुरवठा तहसीलदार वरिष्ठ अधिकारी कर्मचारी हे सुद्धा उपस्थित आहेत तर स्वच्छतेकडे यांचं लक्ष का नाही असा सवाल सामान्य नागरिकांनी उपस्थित केला आहे.

## संजय देशमुख यांच्या खासदारकीचा पहिला वर्षपूर्ती सोहळा – जनतेच्या मनात घर करणारा नेता!

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम**
**गजानन पवार पाटील**

आज ४ जून २०२५ रोजी, खासदार संजय देशमुख यांच्या लोकसभेतील कार्यकाळाला एक वर्ष पूर्ण होत आहे. हा एक वर्षाचा प्रवास म्हणजे यवतमाळ–वाशिम लोकसभा मतदारसंघासाठी विकासाचा, विश्वासाचा आणि संवेदनशील नेतृत्वाचा एक नवा अध्याय आहे. गेल्या पंचवीस वर्षांमध्ये या मतदारसंघाने अनेक नेते पाहिले परंतु, एका वर्षात ज्या पद्धतीने संजय देशमुख यांनी कामगिरी केली, ती पूर्वी कधीही झाली नव्हती. त्यांच्या कार्यशैलीने एक वेगळा आदर्श निर्माण केला आहे – असा आदर्श, जिथे दिल्लीच्या संसदेत आवाज दणदणीत असतो आणि गावोगावी माणसांशी



नाळ जोडलेली असते.संसदेमध्ये त्यांनी शेतकऱ्यांचे प्रश्न, रेल्वे सुविधा, आरोग्यसेवा, पायाभूत सुविधा, युवक रोजगार, महिलांचे हक्क, आदिवासींच्या समस्या असे असंख्य मुद्दे उचलले. पिकविमा, खत टंचाई, कापसाला भाव, यांसारख्या अडचणींवर त्यांनी सरकारकडून थेट उत्तरे मागितली.परंतु त्यांच्या कार्याचा खरा गाभा आहे – जनतेशी असलेला निस्सीम संबंध. ते केवळ खासदार म्हणून दिल्लीत बसले नाहीत, तर दररोज विवाह सोहळे, वाढदिवस, तेरवी, वास्तूशांती, सांत्वन भेटी अशा प्रत्येक ठिकाणी सामान्य माणसाच्या सुखदुःखात सहभागी राहिले. यवतमाळ–वाशिममधील आजारी, गरजू रुग्णांसाठी त्यांनी खास एक स्वतंत्र यंत्रणा निर्माण केली आहे. या यंत्रणेच्या माध्यमातून वैद्यकीय उपचारासाठी ते थेट गरजूंना मदत करतात.या एका वर्षात त्यांनी निव्वळ प्रश्न विचारण्यापुरते काम केले नाही, तर ते जनतेसाठी लढणारे, धडपडणारे आणि सतत उपलब्ध असलेले खासदार म्हणून सिद्ध झाले आहेत. लोकं म्हणतात, "२५ वर्षात कुणी केलं नाही, ते संजय देशमुख यांनी एका वर्षात करून दाखवलं!त्यांच्या नेत्रुत्वात मतदारसंघात नवचैतन्य निर्माण झालं आहे. विकासाला गती, लोकांना साथ आणि प्रत्येक वर्गाच्या हक्कांना आवाज मिळाला आहे.संजय देशमुख हे केवळ खासदार नाहीत, ते आपल्या मतदारसंघाच्या प्रत्येक घराचा, प्रत्येक माणसाचा भाग झाले आहेत.

## लोकनेत्यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदानाचा संकल्प पूर्ण, केदार भगत मित्र परिवाराने 75 बाटल्या केले रक्तदान

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**



लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या 75 व्या वर्षात पदार्पण सोहळ्यानिमित्त केदार भगत मित्र परिवाराने 75 बाटल्या रक्तदानाचा संकल्प पूर्ण केला. केदार भगत यांच्या या कार्याबद्दल रामशेठ ठाकूर आणि आ.प्रशांत ठाकूर यांनी कौतुक केले. याप्रसंगी सभागृह नेते परेश ठाकूर, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, जिल्हा चिटणीस नितीन पाटील,अनिल भगत, जयंत पगडे, गणेश कडू, माजी नगरसेवक अजय बहिरा,दर्शना भोईर, प्रिती जॉर्ज, सुरेखा मोहोकर, सारीका भगत, रमेश गुडेकर, निलेश पाटील, तेजस कांडपिळे, राजू सोनी,प्रभाकर बहिरा,सुनिल बहिरा, उद्योजक मंगेश परुळेकर, विनय पोटे, अमित ओझे, अर्चना ठाकूर,पूनम ठाकूर,आदेश ठाकूर, विशाल सावंत आदी उपस्थित होते.रामशेठ ठाकूर यांनी या रक्तदानाच्या उपक्रमाला शुभेच्छा देत तरूणांचा समाजसेवेत येण्याचा आकडा वाढत आहे.आपल्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रम राबविले जात आहेत.रक्तदान चा उपक्रम राबवित जनतेला भविष्यात याचा लाभ होणार असल्याचे ते म्हणाले. रामशेठ ठाकूर यांनी आपणा सर्वांना दिलेला समाजसेवेचा वारसा आपण जपत आहोत. रक्तदान सारखा उपक्रम राबवत केदार भगत आणि मित्र सामाजिक बांधिलकी जपत आहेत असे आ.प्रशांत ठाकूर यांनी सांगितले. तर परेश ठाकूर यांनी, तरूणांना प्रतिनिधित्व मिळवण्यासाठी जे कार्य केदार भगत आणि मित्र हे करत आहे ते कौतुकास्पद आहेत. समाजाप्रती आपण दायित्व लागतो या उद्देशानेच हे कार्य असेच चालत राहो अशी शुभेच्छा दिली. यावेळी न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीचा एक लाख रूपयांचा अपघाती विमा देखील केदार भगत यांनी 100 नागरिकांना काढून दिला.

# जागतिक पर्यावरण दिन :- संकल्प प्लॅस्टिक मुक्त पर्यावरण- भारत भूमी वर दरवर्षी 9.46 दसलक्ष टन प्लॅस्टिक कचरा.

### पी. व्ही. सी. बॅनरचा पृथ्वीवर प्रचंड कचरा

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड** – पृथ्वी प्लॅस्टिक कचऱ्याने गुदमरत आहे.अर्थ ओ.आर.जी.या अहवालात संशोधक ओलीविया लाई यांनी आकडेवारी दिलीय की पृथ्वी वर दरवर्षी 400 मिलीयन टन प्लॅस्टिकचा कचरा निर्माण होऊन प्रदूषणाचे गंभीर परिणाम मानवासहित सर्व सृष्टीवर होत आहे.या प्लॅस्टिक कचऱ्यात सर्वात दुर्लक्षित मुद्दा हा जाहिराती म्हणून छपाई होणाऱ्या पी. व्ही. सी. बॅनरचा आहे.या बॅनर रुपी कचरा व प्रदूषकाकडे देशाचे लक्ष वेधले आहे सिल्लोड येथील डॉ. संतोष पाटील यांनी. त्यांनी 4 वर्षांपूर्वी एक वापरलेले बॅनर " बहुली "येथील शेतात जमिनीत 5 फूट खड्डा खोदून पुरले व दुसरे बॅनर घरातील पाण्याच्या टाकीत एक वर्ष टाकून ठेवले. जमिनीतील बॅनर 4 वर्षात तसुभर ही विघटित झाले नाही व पाण्यातील बॅनर ही तसेच्या तसे अविघटनशील राहिले. बॅनर हे पॉली विनाईल क्लोराईड या प्लॅस्टिक घटका पासुन बनते जे जमिनीत 100 वर्षे तसेच न कुजता / विघटित न होता भू व जल प्रदूषण होण्यास कारणीभूत ठरत आहे. उन्हाने दुकानांचे फलक / बोर्ड तुकडे तुकडे होऊन पडतात जे पुढे जमिनीत, जल साठे यात मायक्रो प्लॅस्टिक मध्ये परिवर्तीत होतात.जाळले तर त्यातून "डायोक्सिन" व इतर घातक वायू प्रदूषके निर्माण होतात. जमिनीत पडून राहिले तर क्लोरीन मुक्त होतो जो मातीच्या गुणवत्ता व जैवसंस्थेवर प्रभाव सोडतो.

**महापुरुषांचे स्वर्गातून चमकोगीरी करणाऱ्या युवकांना आवाहन** -:-आमच्या एका दिवसाच्या जयंती साठी तुम्ही व तुमचे नेते देशात हजारो टनाचे बॅनर बनवतात व एकाच दिवसा नंतर तो पृथ्वी वर कचरा होतो जो शे-दोनशे वर्ष प्रदूषक म्हणून धरतीवर राहील हे आम्हाला स्वर्गातून बघवत नाही.आम्हाला हे नकोय हे तू तूझ्या नेत्याला ही सांग. एक तासाचा जन्मदिवस त्यात ही तुम्ही बॅनर बनवतात.चमकोगीरी बंद करा. जुन्या बॅनरच्या पिशव्या व शेतकऱ्यांसाठी रेनकोट शीवा.

पर्यावरण मंत्री महोदया पंकजा मुंडे यांना मेल पाठवून बॅनर बाबत ज्या प्रकारे केरळ, नागालँड, हिमाचल प्रदेश या राज्यांनी जसे निर्बंध आणले तशी हरीत आचार संहिता महाराष्ट्रात ही असावी तसेच केंद्राने आदेशीत केल्या प्रमाणे सरकारी कामात बॅनर नसावे अशीही विनंती मी केली आहे.

-- डॉ.संतोष पाटील
अभिनव प्रतिष्ठान

कचऱ्यात गेलेल्या बॅनरचा पुनर्वापर करून पाटील यांनी उपयोगी पिशव्या बनवून त्या काल भाजी मंडीत लोकांना मोफत वाटून 2025 च्या पर्यावरण दिनाच्या प्लॅस्टिक मुक्त ( बिट द प्लॅस्टिक पोल्यूशन ) या थीमवर पुनर्वापराचा संदेश दिला.






# आतड्यांसंबंधी जीवघेणी गुंतागुंत असलेल्या नवजात बाळावर खारघरच्या मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये यशस्वी उपचार

### लहान आतड्याला असलेल्या छिद्रामुळे पोटाचा तीव्र संसर्ग - जन्मल्यानंतर दुसऱ्याच दिवशी केली शस्त्रक्रिया

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई वार्ताहर** : नवी मुंबईतील खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलमध्ये पूर्ण दिवसाच्या नवजात बाळामध्ये आयल पर्फोरेशन (लहान आतड्याच्या मध्यभागी एक छिद्र) आणि फेकल पेरिटोनिटिस ( पोटाचा तीव्र संसर्ग) सारखी दुर्मिळ स्थिती आढळून आली. नवजात शिशु तज्ज्ञ आणि एनआयसीयु विभागाचे प्रमुख डॉ. तन्मेष कुमार साहू यांच्या नेतृत्वाखालील या बाळावर यशस्वी शस्त्रक्रिया यशस्वीरित्या करत या दुर्मिळ आजाराचे व्यवस्थापन करण्यात आले. वैद्यकीय कौशल्य आणि टीमवर्कचे उत्तम उदाहरण या ठिकाणी पहायला मिळाले असून या बाळाला नवे आयुष्य मिळवून देण्यात आले. योनीमार्गे प्रसूती झालेल्या पूर्ण मुदतीत बाळाला जन्मानंतर अवघ्या काही तासांतच जीवघेण्या स्थितीचा सामना करावा लागला. वेळेवर निदान व उपचार आणि तज्ज्ञांच्या सततच्या निरीक्षणामुळे हे बाळ आता बरे होत आहे आणि त्याच्या आयुष्यातील विकासात्मक टप्पे गाठत आहे.

नवी मुंबईतील कामोठे येथे राहणाऱ्या सुहास आणि श्रध्दा राणे या जोडप्याला फेब्रुवारीमध्ये पहिली अपत्यप्राप्ती झाली. ही गर्भधारणा अगदी सुरळीतरित्या पार पडली असून आणि प्रसूतीपूर्व गुंतागुंत झाली नाही. मात्र, जन्मानंतर लगेचच साईशाला रडताना आणि श्वासोच्छवासादरम्यान त्रास होऊ लागला, ज्यामुळे तिला तात्काळ नवजात शिशु अतिदक्षता विभागात (एनआयसीयू) दाखल करावे लागले. पहिल्या दिवशीच बाळाचे पोट सुजले होते. एक्स-रेमध्ये न्यूमोपेरिटोनियम म्हणजे पोटाच्या पोकळीत वायू(गॅस) दिसून आला जे पूर्ण-मुदतीच्या नवजात शिशु मध्ये आढळणारी एक दुर्मिळ आणि गंभीर बाब होती. हे आतड्यांना असलेला छिद्रामुळे उद्‌भवते, जठराच्या मार्गातील या छिद्रामुळे गंभीर गुंतागुंत उद्‌भवू शकते. म्हणून, बाळाला त्वरित उपचारांची आवश्यकता होती. नवी मुंबईतील खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलचे नवजात शिशु तज्ज्ञ आणि एनआयसीयू प्रमुख डॉ. तन्मेष कुमार साहू सांगतात की,* बाळाची प्रकृती पाहता त्याच्या पालकांना सुरुवातीला धक्काच बसला आणि मात्र योग्य समुपदेशनाने त्यांच्या शंकांचे निरसन करण्यात आले. जन्मानंतर दुसऱ्याच दिवशी या बाळावर आपत्कालीन शस्त्रक्रिया करण्यात आली. शस्त्रक्रियेमध्ये लहान आतड्याच्या मध्यभागी एक छिद्र, आतड्यांमधील घटक पोटात गळत असल्याचे आढळून आले ज्यामुळे फेकल पेरिटोनायटिस (पोटाच्या आत संसर्ग) झाला. या जीवघेण्या स्थितीत तातडीने उपचार न केल्यास जगण्याची शक्यता १०% पेक्षा कमी असते. जन्माच्या वेळी कमी वजनाच्या बाळांमध्ये आतड्यांमध्ये छिद्र पडण्याचे प्रमाण सुमारे १% असते आणि विकसित बाळांमध्ये ते खूपच दुर्मिळ असते. याचे कारण सहसा आईमध्ये संसर्ग, बाळामध्ये हायपोक्सियाशी संबंधित असते, जिथे बाळ जन्मानंतर लगेचच रडत नाही. नवी मुंबईतील खारघर येथील मेडिकव्हर हॉस्पिटलच्या बालरोग शल्यचिकित्सक डॉ. पूजा मुलतानी सांगतात की,* पहिली शस्त्रक्रिया लॅप्रोटॉमी होती, जी रात्री उशिरा बाळाच्या शरीराची स्थिती अत्यंत गंभीर असताना आणीबाणीच्या परिस्थितीत केली जाते. बाळाच्या लहान आतड्याच्या मध्यभागी एक छिद्र होते जे प्रामुख्याने दुरुस्त झाले नाही, कारण आजूबाजूच्या आतडे हे मलमूत्रामुळे दूषित झाले होते. म्हणून छिद्र असलेला आतड्याचा तो भाग काढून टाकण्यात आला आणि त्यातून गळालेले मल देखील बाहेर काढून टाकले. या प्रक्रियेदरम्यान कमीत कमी रक्तस्त्राव झाला. या पहिल्या शस्त्रक्रियेतील आव्हानांमध्ये बाळाचे कमी वजन आणि सतत होणारा संसर्गाचा समावेश होता, ज्यामुळे प्रक्रियेचे स्वरूप आणखी आव्हानात्मक होते. डॉ. पूजा मुलतानी पुढे सांगतात की, बाळाचे वजन वाढल्यानंतर (सुमारे ३ किलोपर्यंत पोहोचल्यानंतर) दुसऱ्या शस्त्रक्रियेचे नियोजन करण्यात आले. याबाबत पालकांचे समुपदेशन करण्यात आले. डॉ. तन्मेष कुमार साहू यांनी सांगितले की, शस्त्रक्रियेनंतर, नवजात बाळाला व्हेंटिलेटरवर ठेवण्यात आले आणि त्याला टोटल पॅरेंटरल न्यूट्रिशन (TPN) देण्यात आले. दररोज बाळाच्या शरीरातील सुमारे २०० मिली द्रवपदार्थ आतडयातील छिद्रातून बाहेर पडत होते. यामुळे त्याच्या शरीरातील द्रवरदार्थाचे प्रमाणा कमी झाले आणि अतिसार झाला, ज्यामुळे बाळाला आहाराचे सेवन करणे आणि वजन वाढविणे अवघड झाले होते. आहार देऊनही बाळाचे वजन जन्माच्या वेळी असलेल्या २.५ किलो वजनापासून २.२ किलो पर्यंत कमी झाले. हळूहळू, बाळाला आतड्यांसंबंधी समस्या आढळू लागल्या. अखेर, बाळाच्या शरीरातील प्रणालीने हायड्रोलायझ्ड प्रोटीन फॉर्म्युला स्वीकारला. संसर्ग आणि यकृताच्या दुखापतीसारख्या गुंतागुंतींचे देखील काळजीपूर्वक व्यवस्थापन करण्यात आले. बाळाचे योग्य वजन राखणे आणि अवयवांचे कार्य सुरळीत पार पडण्यासाठी बारकाईने निरीक्षण करण्यात आले. अडीच महिन्यांनी बाळाच्या प्रकृतीत सुधारणा दिसून आली. सुरुवातीला बाळाने आईचे दूध स्विकारले नाही अखेर हायड्रोलायझ्ड फॉर्म्युल्यानंतर आईचे दुध देण्याचा प्रयत्न करण्यात आला आणि हळूहळू वजन वाढू लागले. १४ मे रोजी बाळाला घरी सोडण्यात आले. तेव्हा त्याचे वजन ३.२ किलो इतके होते. पहिल्या फॉलो-अपमध्ये, बाळाची विकासत्मक वाढीची नोंद व वजन वाढल्याचे दिसून आले अशी प्रतिक्रिया डॉ. तन्मेष साहू यांनी व्यक्त केली. आमच्या बाळाला इतक्या गंभीर स्थितीशी झुंजताना पाहून आम्ही खूप घाबरलो होतो. बाळाला जन्मानंतर त्वरीत शस्त्रक्रियेची आवश्यकता भासणार आहे याचा विचार करुनच आम्ही चिंताग्रस्त झालो होतो. मेडिकव्हर हॉस्पिटलमधील डॉक्टरांच्या टिमने आम्हाला खुप आधार दिला. आज, आमचे बाळ त्याच्या वयानुसार विकासाचे टप्पे गाठत आहे आणि हे आमच्यासाठी चमत्कारापेक्षा कमी नाही अशी प्रतिक्रिया बाळाचे वडिल सुहास राणे यांनी व्यक्त केली.

# नगरपंचायत द्वारा शहरात प्लॅस्टिक जप्तीची कारवाई

### नगरपंचायतीने केले विक्रेत्यांकडून ४२ किलो प्लॅस्टिक जप्त

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी**
**राहुल कुलकर्णी**

निफाड नगरपंचायत मुख्याधिकारी अमोल चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली स्वच्छ सर्वेक्षण २०२४-२५ व माझी वसुंधरा ६.० अंतर्गत व सिंगल यूज व एकल वापर प्लॅस्टिक बंदी अंमलबजावणी मोहिम हाती घेण्यात आली. निफाड शहरात दि. २ जून २०२५ ते ४ जून २०२५ शहरात विविध ठिकाणी होलसेल दुकान, फळ विक्रेते, सामान्य विक्रेते यांच्या वर प्लॅस्टिक जप्तीची कारवाई करण्यात आली. मोहिमेचे प्रमुख स्वच्छता निरीक्षक विनोद त्रिभुवन यांनी व्यवसायिकांकडून प्लॅस्टिक जप्तीची धडक कार्यवाही करत एकूण ४२ किलो प्लॅस्टिक जप्त करून दंड केला आहे. या मोहीम मध्ये स्वच्छता लिपिक शरद काकुळते, स्वच्छता मुकादम सुनील गांगुर्डे, शहर समन्वयक प्रवीण पठाडे, बिलाल पठाण, संकेत मोगरे, तुषार इंगळे, आदी उपस्थितीत होते. निफाड शहरातील आठवडा बाजार शुक्रवारी तसेच शहरात नियमितपणे ही मोहीम राबविली जाणार असून, नगरपंचायतीने याबाबत सक्त सूचना दिल्या आहेत. शहरातील विक्रेते, फुलविक्रेते, स्थानिक बाजारपेठेत, भाजीपाला मंडई, दुकाने या ठिकाणी एकल वापर प्लॅस्टिक जप्ती व बंदी करण्याची मोहीम राबविली जाणार आहे



# जे प्राईम बिल्डकॉनची बिझनेस मीट, संकल्प 2025 मुंबई 3.0 च्या विकासाच्या नव्या पर्वाची सुरुवात

दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर : जे प्राईम बिल्डकॉन, परवडणाऱ्या घरांच्या क्षेत्रात वेगाने प्रगती करणाऱ्या ब्रँड्सपैकी एक असून यांनी नुकतीच त्यांची भव्य बिझनेस मीट 'संकल्प 2025' आयोजित केली. या कार्यक्रमात 200 हून अधिक टॉप चॅनल पार्टनर्स आणि नवी मुंबईतील पाहुण्यांनी सहभाग घेतला. भागीदारी, एकत्रित दृष्टीकोन आणि नव्या मुंबईच्या विकासात सामूहिक योगदान या हेतूने हा कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमातील प्रमुख आकर्षण ठरले दिलीप औटी यांचे स्फूर्तिदायक व अनुभवसंपन्न मार्गदर्शन. आंतरराष्ट्रीय बिझनेस स्ट्रॅटेजिस्ट आणि कोच म्हणून त्यांचा अनुभव आणि एमएसएमई, प्रोफेशनल्स व रिअल इस्टेट क्षेत्रासाठी त्यांनी दिलेले विचार जे प्राईम बिल्डकॉनच्या पीपल फर्स्ट दृष्टिकोनाशी सुसंगत होते. कार्यक्रमाला मराठी चित्रपट व मालिकांतील लोकप्रिय अभिनेत्री जान्हवी किल्लेकर आणि सेलिब्रिटी अँकर, कॉमेडी तडका फेम अभिनेता ओम यादव उपस्थित होते. कार्यक्रमाचा मुख्य क्षण ठरला जे प्राईम बिल्डकॉनचे एम.डी. अविनाश जगदाळे यांचे प्रेरणादायी भाषण. त्यांनी 'मुंबई 3.0' या नव्या शहर विकास संकल्पनेबद्दल आपली भूमिका मांडली, जे महाराष्ट्रासाठी अधिक स्मार्ट, आधुनिक आणि सुसंगत भविष्याकडे एक धोरणात्मक पाऊल आहे. त्यांनी विशेषतः पुष्पक नगर परिसराची महत्त्वाची भूमिका अधोरेखित केली. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ व अटल सेतू यांच्या नजीक असलेल्या या भागात येत्या काळात गुंतवणूक, पायाभूत सुविधा व जीवनशैलीत मोठे बदल घडतील, असे ते म्हणाले. कार्यक्रमात जे प्राईम बिल्डकॉनने मागील वर्षात उत्कृष्ट कामगिरी केलेल्या चॅनल पार्टनरला पारितोषिक देऊन सन्मानित केले. तसेच, अरिवली, गिरवले आणि आष्टे या एमएसआरडिसी अंतर्गत येणाऱ्या ठिकाणी जे प्राईम बिल्डकॉनचे आगामी टाउनशिप प्रकल्प लवकरच सुरू होणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले, जे भविष्यातील आधुनिक, नियोजित शहरांच्या दिशेने एक पाऊल आहे.

# डॉ प्रभाकर गांधी यांचे बंधू स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रय गांधी यांचे वृद्धापकाळाने निधन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**



भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महत्त्वाच्या 'चले जाव' चळवळीत सक्रिय सहभागी झालेले पनवेल येथील सुप्रसिद्ध डॉक्टर प्रभाकर गांधी यांचे बंधू स्वातंत्र्यसैनिक दत्तात्रय गांधी यांचे वृद्धापकाळाने जोगेश्वरी येथील निवासस्थानी निधन झाले. ते १०२ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात तीन मुली, एक जावई आणि नातवंडे असा परिवार आहे. गांधी यांच्या इच्छेनुसार कुटुंबियांनी मुंबईतील नायर रुग्णालयात त्यांचे देहदान केले. दत्तात्रय गांधी यांचा जन्म १५ मे १९२३ रोजी रायगड जिल्ह्यातील पोलादपूर येथे झाला. त्यांच्या घरातील सदस्य भारतीय स्वातंत्र्य लढ्यात सक्रिय होते ,वडील गोपीनाथ लालाजी गांधी आणि जेष्ठ बंधू शंकर गोपीनाथ गांधी हे दोघेही स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाले होते तर दत्तात्रेय गांधी यांचे धाकटे बंधू प्रभाकर गोपीनाथ गांधी हे देखीलस्वातंत्र्य लढयात सहभागी झाले होते संपूर्ण गांधी कुटुंबीय स्वातंत्र्य लढ्यात सहभागी असल्यामुळे दत्तात्रय गांधी हे देखील स्वातंत्र्य लढ्यात सामील झाले आणि महात्मा गांधींच्या विचारांकडे आकर्षित होऊन कार्य करू लागले. ८ ऑगस्ट १९४२ रोजी झालेल्या चले जाव चळवळीत सहभागी झाल्याने त्यांनी दीड वर्ष तुरुंगवास भोगला. त्यांनी पुढे राष्ट्र सेवा दलात काम केले. साने गुरुजींच्या सल्ल्यानंतर शिक्षक म्हणून काम सुरू करीत मुंबईतील छबिलदास शाळेत ३५ वर्षे अध्यापन केले. दरम्यान, गांधी यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी १३ जून रोजी सायंकाळी ६ वाजता गोरेगाव (प.) येथील केशव गोरे स्मारक ट्रस्टच्या सभागृहात अभिवादन सभा आयोजित करण्यात आली आहे.

# बायांनो सांभाळा आपले सौभाग्यलंकार...

दैनिक युवक आधार
तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी

बस स्थानकावरील गर्दीचा फायदा घेऊन चोरटे प्रवाशांचे पर्स, ,पाकिट, दागिने घेऊन पोबारा करीत आहेत. जास्तीत जास्त बस स्थानकांत दर दोन तीन दिवसांनी एका तरी प्रवाशाचे काही तरी लंपास झाल्याची घटना घडत आहे. त्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेचा प्रश्न नेहमीच ऐरणीवर आला आहे. याकरिता एसटी प्रशासन व पोलीस प्रशासन योग्य ती खबरदारी घेत आहे. प्रवाशांना सतर्क केले जात आहे.

बस स्थानकात चाकरमानी, व्यावसायिक, शाळा कॉलेज चे विद्यार्थी यांची बस साठी सकाळी ६ वाजल्यापासून ते रात्री ९ वाजेपर्यंत बस स्थानकात गर्दी पहावयास मिळते. आणि महाराष्ट्र एसटी महामंडळाने एसटी प्रवासी भाड्यात सवलत दिली असल्याने प्रवासी संख्या जास्तीत जास्त महिला प्रवासी संख्येत वाढ होत आहे. अशा गर्दी च्या वेळी चोरटे महिलांच्या दागिन्यांवर आपली नजर ठेवून



असतात. पर्स, पिशवी, चोरण्यात यशस्वी ही होतात. बस मध्ये चढताना गर्दी चा फायदा घेऊन चैन, मंगळसूत्र, मोबाईल वर हात साफ करून पसार होतात.

याकरता बस स्थानकातील कॅमेरे सुरक्षारक्षक पोलिसांकडून बस स्थानक परिसरात पाहणी केले जात असल्याचे एसटी महामंडळाकडून सांगण्यात आले आहे .तरीही पेण,पनवेल उरण, अलिबाग आदि बस स्थानक परिसरात चोरीच्या घटना घडत आहेत .अनेक बसेस मध्ये जागा मिळावी म्हणून प्रवासी एकच गर्दी करत असतात, गर्दीमध्ये प्रवासी बस मध्ये चढण्यासाठी प्रयत्न करतात आणि याचा फायदा चोर गर्दीत शिरतात आणि हात साफ करतात.विशेष करून पर्स, मंगळसूत्र ,मोबाईल चोरणे त्यांना या गर्दीत सोपे जात असल्याचे दिसून येते.

कुणीही गर्दीत जाताना आपली काळजी घेणे गरजेचे आहे. गर्दीचा फायदा घेऊन आपल्या मौल्यवान दागिने ,पर्स पिशवी चोरी होऊ नये यासाठी सतर्कता बाळगणे गरजेचे आहे. मौल्यवान दागिने घालून प्रवासाला जाऊ नये, आणि गेलं तरी सतर्क व सुरक्षित राहायला पाहिजे. आजकाल बस स्थानकात कॅमेरे बसवण्यात आले आहेत. एसटी महामंडळ सुरक्षा रक्षक यांच्याकडून ही पाहणी केली जाते. रात्री पोलिसांची गस्त घातली जाते. तसेच वेळोवेळी बस स्थानकात मौल्यवान वस्तू सांभाळण्यासाठी प्रवाशांना सूचित केले जाते. तरीही आवश्यक ती सावधानता न बाळगल्याने सतर्क न राहिल्याने दिवसेंदिवस चोरीच्या ही घटना वाढत आहेत.

# तळोजा पोलिसांच्या धडक कारवाईत 48 मोबाईल व 1 लॅपटॉप असा एकूण 8 लाख 5 हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल मुळ मालकांना केला परत

दैनिक युवक आधार
पनवेल, वार्ताहर



: नवी मुंबई पोलीस आयुक्तलाया अंतर्गत सीईआयआर पोर्टलचा प्रभावीप्रणे वापर करुन तांत्रिक तपासादरम्यान 48 मोबाईल व 01 लॉपटॉप असा एकुण 8 लाख 5 हजार किंमतीचा मुद्देमाल केला हस्तगत करुन मुळ मालकांना हस्तांतर केला.
पोलीस आयुक्त मिलिंद भांरबे, अप्पर पोलीस आयुक्त संजय येनपुरे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ 02 प्रशांत मोहीते. सहा. पोलीस आयुक्त पनवेल विभाग अशोक राजपुत यांचे मागर्दशनाने तळोजा पोलीस ठाणे हद्दीत हरवलेले मोबाईल फोन याबाबतची तक्रार नोंदविण्या करीता नागरिकांना भारत सरकारव्दारे सीईआयआर पोर्टल सुरु करण्यात आले. तळोजा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक प्रविण भगत, पोलीस निरीक्षक (गुन्हे) सागर निकम यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे पोलीस उप निरीक्षक ज्ञानोबा धुळगंडे, पोहवा विनोद डुंबरे पाटील, पोशि सचिन माने, पोहवा नैनेश पाटील, पोहवा दिपक सावंत, पोहवा अजय मढवी, पोहवा शंकर शिंदे, पोशि राजेश उगाडे, पोशि अनिल जाधव यांनी विविध राज्यातुन आतापर्यंत एकुण 8 लाख 5 हजार रुपये किंमतीचे 48 मोबाईल फोन व 01 लॉपटॉप हस्तगत केला होता. सदरचे हस्तगत मोबाईल फोन व लॉपटॉप मुळ मालकांना पोलीस ठाण्यात बोलावुन वपोनि प्रवीण भगत यांच्या हस्ते सन्मानपुर्वक परत केला आहे. मोबाईल व लॅपटॉप परत मिळाल्याबद्दल नागरिकांनी पोलीसांचे आभार व्यक्त करुन मनापासुन कौतुक केले.


# नोटीस

**पनवेल महानगर पालिका पगारदार नोकरांचीसहकारी पतसंस्था मर्यादित, पनवेल.**
**नोदणी क्रं. ८९४३,/1945**
**पनवेल महानगरपालिका कार्यालयाजवळ,**
**पनवेल, जिल्हा-रायगड.**

श्री. / श्रीमती - सर्व सभासद यांसी..........
वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना'

या संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दिनांक ०८/०६/२०२५ रोजी सकाळी-१०-३० वाजता संस्थेच्या कार्यालयात संस्थेच्या कार्यक्रम पत्रिकेवरील कामकाजावर विचार करण्यासाठी होणार आहे.. तरी आपण सर्व सभासदांनी सदर सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

**सभेची कार्यक्रम पत्रिका**

१. दिवंगत सभासदांना श्रध्दांजली अर्पण करणे.
२. मागिल सभेचे दि. ०९/०६/२०२४ चे इतीवृत्त वाचून कायम करणे.
३. दिनांक-०१/०४/२०२४ ते ३१/०३/२०२५ या वर्षाची जमाखर्च, नफा तोटा पत्रक व ताळेबंद सम्मत करणे.
४. कार्यकारी मंडळाने शिफारसीनुसार सन-२०२४-२०२५ या वर्षातील नफा विभागणीस मंजूरी देणे.
५. संस्थेचा सन-२०२४-२५ चा लेखा परिक्षण अहवाल वाचन करणे.
६. संस्थेचे सन-२०२५-२६ चे लेखा परिक्षण करणेसाठी लेखा परिक्षकांस मंजूरी देणे.
७. अंतर्गत लेखा परीक्षक नेमणे व त्यांचा मेहनताना ठरविणे,
८. अध्यक्षांचे परवानगीने येणारे विषयांचा विचार करणे.

**पनवेल. विशेष सूचना-**
१) सभेस आवश्यक गणपूर्ती न झाल्यास सभा तहकूब करून त्याच दिवशी त्याच ठिकाणी अर्ध्यातासाने भरेल व अशा सभेला गणपूर्ती आवश्यक असणार नाही.
२) ज्या सभासदांना काही प्रस्तांव अथवा सूचना मांडावयाच्या असतील त्यांनी आपला प्रस्तांव अथवा सूचना सभेच्या 5 दिवस अगोदर पर्यंत संस्थेच्या कार्यालयीन वेळेत पोहचतील असे पाठवावे व सभेला स्वतः उपस्थित रहावे.
३) सन-२०२५-२०२६ या वर्षी ज्या सभासदांची मुले १०वी, १२वी व १९५वी पास झाली असतील त्यांनी गुण पत्रिकेची झेरॉक्स प्रत 30 सप्टेबर पर्यंत सादर करावी.
४) सभेस येते वेळी सूचना पत्र बरोबर आणावे.

**आपला विश्वासू,**
अध्यक्ष
(भावेश जयंत चंदने)
पनवेल महानगर पालिका पगारदार
नोकरांचीसहकारी पतसंस्था मर्यादित, पनवेल.


# रा.जि.प अलिबाग येथे शैक्षणिक कार्य संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांची भेट

दैनिक युवक आधार
रोहा रायगड



महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षक समिती रायगड यांनी नेहा भोसले (भा.प्र.से.) मुख्य कार्यकारी अधिकारी राजिप अलिबाग,पुनिता गुरव शिक्षणाधिकारी (प्राथ) राजिप अलिबाग यांची सदिच्छा भेट घेण्यात आली. भेटी दरम्यान खालील विषयावर चर्चा करण्यात आली. *१) दि. १ नोव्हेंबर पूर्वीची जाहिरात असलेल्या शिक्षकांना जुनी पेन्शन संदर्भात खाते क्रमांक राहिलेल्या शिक्षकांचे त्रुटी दूर करून संचालक साहेब पुणे येथे शिफारस करावी व पीएफ कपात साठीची टॅब चालू करण्यासंदर्भात पत्रव्यवहार करावा* *२) तसेच राहिलेले शिक्षकांचे स्थायित्व प्रमाणपत्र लवकर मिळणे संदर्भात चर्चा करण्यात आली* \ *३) शिक्षकांची प्रलंबित मेडीकल बिल, भविष्य निर्वाह निधी नापरतावा प्रस्ताव संदर्भात चर्चा करण्यात आली.* *४) ऑनलाईन शिक्षक बदलीपूर्वी केंद्रप्रमुख, विस्तार अधिकारी, मुख्याध्यापक पदोन्नती प्रक्रिया पूर्ण करणेबाबत* *या भेटीदरम्यान रायगडचे जिल्हाध्यक्ष, विजयजी येलवे , रोहा तालुकाध्यक्ष ब्रिजेश भादेकर, रोहा तालुका सरचिटणीस संजय बागडे , रोहा तालुका कार्यालयीन चिटणीस संतोष धोत्रे आदि. शिक्षक उपस्थित होते.*

# सिंधुदुर्गचे सुपुत्र श्री.अच्युत पालव यांना पद्मश्री

## "सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघातर्फे सन्मान"

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

पद्मश्री अच्युत पालव हे प्रसिद्ध सुलेखनकार (कॅलिग्राफर) आणि शिक्षक आहेत. त्यांना भारतीय लिप्यांच्या कलेतील योगदानाबद्दल पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. त्यांचे कॅलिग्राफीतील योगदान खूप महत्त्वाचे आहे.अच्युत पालव यांनी कॅलिग्राफी या पारंपरिक कलेला नवी ओळख दिली आहे. त्यांनी मोडी लिपी आणि इतर भारतीय लिप्यांच्या अभ्यासावर लक्ष केंद्रित केले आहे. त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून 2025 मध्ये त्यांना पद्मश्री पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार त्यांना भारतीय लिप्यांच्या कलेतील योगदानाबद्दल आणि राष्ट्रीय स्तरावर या कलेला प्रसिद्धी मिळवून देण्याबद्दल दिला आहे. त्यांच्या कॅलिग्राफीची शैली अभिव्यक्त आणि वेगळी आहे. ते टूथब्रश आणि स्पॅटुला सारख्या अपारंपरिक साधनांचाही वापर करतात.

त्यांनी शहराच्या सुशोभीकरणासाठी 'चित्रकविता भिंती' (पोएटिक वॉल आर्ट) या संकल्पनेवर काम केले आहे, ज्याने त्यांना प्रसिद्धी मिळवून दिली आहे. अच्युत पालव स्कूल ऑफ कॅलिग्राफी नावाचे ते एक स्कूल चालवतात जिथे ते कॅलिग्राफी शिकवतात.

महाराष्ट्रातील सिंधुदुर्ग मधील अणावं गावचे ते निवासी आहे. सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघाच्या वतीने पद्मश्री अच्युत रामचंद्र पालव यांचा पारंपारिक पद्धतीने शाल,श्रीफळ आणि सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला. पनवेल महानगरपालिकेचा लोगो देखील त्यांनीच बनवला आहे. ह्या सत्कार प्रसंगी संघाचे अध्यक्ष केशव राणे, सचिव बाप्पा मोचेमाडकर, मंगेश अपराज, वासुदेव सावंत, प्रदीप रावले,कालिदास कावले, बाळाजी रावराणे, अरविंद खांडेकर उपस्थिती होते.




सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# घराजवळ लावलेली रिक्षा अज्ञात चोरट्यांनी लांबवली

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी**
**राजेश भडांगे**



**विंचूर-** येथील येवला रोडवरील स्वामी समर्थ कॉलनीतून रविवारी रात्रीच्या सुमारास रिक्षा चोरून नेल्याची घटना घडली. याबाबत लासलगाव पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीच्या विरोधात चोरीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विंचूर परिसरात वाहनांच्या चोरीच्या घटना वारंवार घडत असल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहेत. येथील मुंकदा बाहीकर व ज्ञानेश्वर बाहीकर यांचा हॉटेल व्यवसाय आहे. त्यांनी हॉटेल व घरगुती कामासाठी नाशिक येथून पियाजो कंपनिची एपे रिक्षा (क्र.एम एच १५ डी एम ३९५०) विकत घेतली होती. ज्ञानेश्वर बाहीकर हे रविवार ता.०१ रोजी रात्री ११ वाजता हॉटेलवरून येवला रोडवरील स्वामी समर्थ कॉलनी येथील राहत्या घरी रिक्षा घेऊन गेले. घरासमोर नेहमीच्या ठिकाणी रिक्षा उभी केली. त्यानंतर ते जेवण करण्यासाठी घरात गेले. त्यांचे बंधू मुकुंदा बाहीकर हॉटेलचे कामकाज आवरून रात्री साडेबारा वाजेच्या सुमारास घरी आले. त्यावेळी त्यांना घरासमोर रिक्षा उभी दिसली नाही. त्यांनी घरात झोपलेल्या ज्ञानेश्वरकडे चौकशी केली असता ज्ञानेश्वरने सांगितले, मी घरासमोरच रिक्षा उभी केली होती व मी जेवण करुन झोपलो होतो. त्यानंतर घरातील सर्वजण आजुबाजुला रिक्षाचा शोध घेवू लागले. परंतु त्यांना रिक्षा मिळून आली नाही. तेव्हा रिक्षा चोरीला गेल्याचे त्यांच्या लक्षात आले. त्यानंतर त्यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीविरुद्ध रिक्षा चोरीला गेल्याची नोंद करण्यात आली आहे. परिसरात चोरीच्या घटना अशा वारंवार घडत असल्याने नागरिकांनी आपले वाहन सुरक्षित ठिकाणी लावण्याचे आवाहन लासलगाव पोलीस ठाण्याच्या वतीने करण्यात आले आहे.

# केंद्र सरकार प्रधानमंत्री आवास योजना ग्रामीण अंतर्गत-छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यात सिल्लोड तालुक्याला सर्वाधिक 10 हजार 576 नविन घरकुलांचे उद्दिष्ट मंजूर.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड :** - केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत महाराष्ट्राच्या ग्रामीण भागासाठी 10 लाख घरकुलांचे उद्दिष्ट मंजूर केले. त्याअंतर्गत छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात 57 हजार 594 घरकुलला नव्याने उद्दिष्ट मंजूर झाले. त्यापैकी सिल्लोड तालुक्याला जिल्ह्यात सर्वाधिक म्हणजेच 10 हजार 576 नवीन उद्दिष्ट आले असल्याची माहिती आमदार अब्दुल सत्तार यांनी दिली. आज पुणे येथील बालेवाडी येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय ग्रामविकास मंत्री शिवराज सिंग चौहान यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) लाभार्थी मेळावा व महाआवास अभियान राज्यस्तरीय पुरस्कार वितरण कार्यक्रमात याबाबतचे पत्र केंद्र शासनाच्या वतीने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सोपविण्यात आले असल्याचे आ. अब्दुल सत्तार म्हणाले.

### ड' यादीतील लाभार्थ्यांनी ग्राम पंचायत मार्फत पंचायत समिती कार्यालयात संचिका सादर कराव्यात

घरकुलाचे जिल्ह्यात सर्वाधिक उद्दिष्ट सिल्लोडला मिळाल्याने तालुक्यातील 'ड' यादीतील प्रत्येक गावातील पात्र लाभार्थ्यांना प्रधानमंत्री घरकुल योजनेचा लाभ मिळणार असून 'ड' यादीतील लाभार्थ्यांनी ग्राम पंचायत मार्फत पंचायत समिती कार्यालयात संचिका सादर कराव्यात जेणे करून पंचायत समितीला तात्काळ संचिका मंजूर करून पात्र लाभार्थ्यांना लाभ देता येईल.

**- आ.अब्दुल सत्तार**

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात खालील प्रमाणे मिळाले नवीन उद्दिष्ट
छत्रपती संभाजीनगर - 3474
गंगापूर - 8719
कन्नड - 7449
खुलताबाद - 1728
पैठण - 7744
फुलंब्री - 4443
सोयगाव - 3363
वैजापूर - 10098
सिल्लोड - 10576

जिल्ह्यात सिल्लोड तालुक्यात सर्वाधिक घरकुलांचे उद्दिष्ट मंजूर केल्याने आमदार अब्दुल सत्तार यांनी केंद्रीय ग्रामविकास मंत्री ना.शिवराज सिंग चौहान, मुख्यमंत्री ना. देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री ना.एकनाथराव शिंदे, उपमुख्यमंत्री ना.अजित पवार, ग्रामविकास व पंचायतराज मंत्री ना.जयकुमार गोरे, राज्यमंत्री योगेश कदम, ग्राम विकास व पंचायत राज विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले यांना धन्यवाद देऊन आभार मानले. तालुक्यात पहिल्या टप्प्याची घरे पूर्ण करीत असतांना शासनाने 10 हजार 576 घरकुलांना नव्याने मंजुरी दिली असल्याने जुन्या 'ड' यादीपैकी एकही पात्र लाभार्थी घरकुल योजनेपासून वंचित राहणार नाही असे आ. अब्दुल सत्तार म्हणाले



## बीड जिल्हा सहकारी बोर्डावर संगीता पोकळे यांची सातव्यांदा बिनविरोध संचालक संचालक म्हणून निवड

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी :-**
**मारुती सत्रे**



बीड जिल्ह्यामध्ये सहकाराचे शिक्षण व प्रशिक्षण देणाऱ्या बीड जिल्हा सहकारी बोर्ड वर संचालक म्हणून आष्टीच्या सौ. स संगीता सिताराम पोकळे यांची सातव्यांदा बिनविरोध निवड झाली आहे.महाराष्ट्र राज्य सहकारी संघ पुणे या राज्य संघाचे त्यांनी पाच वर्ष संचालक पद भूषवले आहे.आष्टी तालुका सरकारी दूध संघाच्या संचालक म्हणून त्यांनी अकरा वर्ष काम पाहिले.या दूध संघाच्या उपाध्यक्ष व अध्यक्षपदी ही काम भूषविले आहे.त्यांच्या या निवडीबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

## बसंती गीते यांच्या स्मरणार्थ मोफत डोळे तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबीर संपन्न

### नागोठणे लायन्स क्लब यांचा उपक्रम,14 रुग्ण मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी पनवेल येथे रवाना

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे :वार्ताहर**

लायन्स क्लबच्या आयोजित डॉ.अनिल गीते यांच्या सौजन्याने कै.बसंती तुकाराम गीते यांच्या स्मरणार्थ तसेच आर. झुनझुनवाला - शंकरा आय रुग्णालय न्यु पनवेल यांच्या विद्यमाने बाळासाहेब ठाकरे नगर मधील लायन्स क्लबच्या सभागृहात बुधवार 04 जून रोजी मोफत डोळे तपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया शिबिर माजी सैनिक तुकाराम गीते, संगीता गीते, श्वेता शेलार, स्मिता पाभरेकर,क्लब अध्यक्ष सुनील कुथे,सेक्रेटरी डॉ. अनिल गीते यांच्या प्रमुख उपस्थिती संपन्न झाला. सदरील शिबिराचा 44 रुग्णांनी लाभ घेतला असून त्यापैकी 14 रुग्णांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेसाठी नवीन पनवेल येथे पाठविण्यात आले असून यावेळी क्लबचे विवेक सुभेकर, संतोष शहासने, यशवंत चित्रे, प्रकाश जैन,विकास चौलकर,दौलत मोदी,सखाराम ताडकर,दीपक गायकवाड, सुधाकर जवके, दीपिका गायकवाड, विद्या म्हात्रे,सुजाता जवके, विजय शहासने,विशाल शिंदे,दीपक लोणारी,सिद्धेश काळे, विवेक करडे, ऋतुजा पांचाळ,रुग्णालयच्या डॉ.सलोनी सुभेकर व त्यांचे सहकारी तसेच क्लब पदाधिकारी सदस्य व नागरिक उपस्थित होते. यावेळी यशवंत चित्रे,डॉ. अनिल गीते,सुनील कुथे यांनी आपले विचार मानले असून कार्यक्रमाचे प्रस्तावना व आभार प्रदर्शन विवेक सुभेकर यांनी केले.

## _HRSPM कॉलेज मधुन पहिला क्रमांक पटकावत कु. तेजशा देखणे हिची LLB पदवी ला गवसणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. देवेंद्र ओव्हाळ**
**पुणे खेड**



"सरकारी हुद्यावर मुलगी बसली असती का फुले सावित्री नसती तर मुली शिकली असती का"

महिलांना चूल आणि मूल या पलीकडे मनुस्मृतीने पोहचू दिले नाही

पण आज बाबासाहेबांच्या संविधानामुळे अनेक महिलाना राष्ट्रपती पदापर्यंत पोहोचता आले आणि आजही अनेक महिला उंबऱ्या बाहेर पडून अनेक मोठ्या पदांना गवसणी घालत आहे त्यामध्ये शिरोली गावचे सुपुत्र आणि रिपब्लिकन सेनेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष संजय देखणे यांची एक कन्या कु मुदीता संजय देखणे या शिरोली गावच्या लोकनियुक्त सरपंच आहेत तर दुसरी कन्या कु.तेजशा संजय देखणे यांनी नुकतीच चालू वर्ष सन 2025 मध्ये HRSPM कॉलेजमधून पहिला क्रमांक पटकावत एल एल बी ची पदवी मिळवली आहे त्यामुळे खेड तालुक्यातीतून मुलींना घडवणाऱ्या आई-वडिलांच आणि मुलीचं कौतुक होत आहे

# कळंबोली येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांची पुण्यतिथी विविध उपक्रमाने साजरी

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**







मंगळवार दिनांक 3 जून रोजी लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे साहेब यांचा अकरावा स्मृतिदिन भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला . स्वामी समर्थ मंदिर सेक्टर 4 येथे जय भगवान युवा प्रतिष्ठान यांच्यावतीने सकाळी ११.०० ते ४.०० या वेळेत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते . कामोठ्यामधील स्वस्तिक ब्लड बँक यांनी यामध्ये सहभाग घेऊन अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले . या रक्तदान शिबिरास पनवेलचे कार्यसम्राट आमदार माननीय प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून रक्तदात्यांचा उत्साह वाढवला . यावेळी उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील , युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर , कळंबोली चे माजी शहराध्यक्ष रवीनाथ पाटील माजी नगरसेवक बबन मुकादम सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष अशोक मोटे भाजपा नेते सितु शर्मा , भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे व अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते . रक्तदान शिबिरानंतर अध्यात्मिक महिला मंडळाचा गीता पठणाचा कार्यक्रम झाला . रात्री सात ते नऊ ह . भ . प . आदिनाथ महाराज लाड शास्त्री आळंदी देवाची यांचे सुंदर व सुश्राव्य किर्तन झाले . या कीर्तनामध्ये महाराजांनी मुंडे साहेबांच्या आठवणी आणि त्यांचा प्रवास श्रोत्यांसमोर मांडला . या कार्यक्रमास कोकण म्हाडाचे माजी सभापती मा बाळासाहेब पाटील कळंबोली शहराध्यक्ष अमर पाटील माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा , देविदास खेडकर इत्यादी मंडळींनी हजेरी लावली . कार्यक्रमानंतर आलेल्या सर्व भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जय भगवान युवा प्रतिष्ठानचे सर्व युवा कार्यकर्ते तसेच कृष्णा गर्जे व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांनी प्रचंड मेहनत घेतली . व कार्यक्रम यशस्वी केला .

# वाकद शिवारात घरफोडी; रोख रक्कम व दुचाकीची चोरी

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी.**
**राजेश भडांगे**

**शिरवाडे वाकद :- वाकद शिवार ता. निफाड** येथे अज्ञात चोरट्याने घरफोडी करून सुमारे ६५ हजार रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी कैलास विठ्ठल गायकवाड वय ५७ यांनी लासलगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, गायकवाड यांच्या घराजवळ असलेल्या लोखंडी पेटीतून चोरट्याने ₹५०,००० रोख रक्कम (₹१०० च्या नोटा) चोरून नेली. याशिवाय, विजय ज्ञानेश्वर शिंदे यांच्या मालकीची काळ्या रंगाची शाईन कंपनीची मोटार सायकल (एम.एच.१५ जे.एफ.४५२७) देखील चोरीस गेली. दुचाकीची किंमत अंदाजे ₹१५,००० असून एकूण चोरीचे मूल्य ₹६५,००० इतके आहे. ही घटना दि. १९ मेच्या रात्री ११ वाजेपासून ते दि. २० मेच्या पहाटे ३ वाजेदरम्यान घडली. घटनेनंतर गायकवाड यांनी परिसरात व शेजारील गावांमध्ये शोध घेतला. मात्र, काही माहिती न मिळाल्याने त्यांनी काल पोलीस ठाण्यात हजर होऊन तक्रार दाखल केली. घटनास्थळी सपोनि भास्करराव शिंदे यांनी भेट दिली असून पो.हवा संदीप शिंदे अधिक तपास करीत आहेत.




**दैनिक युवक आधार -** महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दूरदृष्टीतून व राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नियोजन विभागाच्या सहकार्याने अष्टविनायक गणपती मंदिरांच्या जीर्णोद्धार व विकास आराखड्यासाठी १४७ कोटी ८१ लाख रुपये इतक्या भव्य निधीस मान्यता मिळाली आहे. या निधीसाठी आमदार महेंद्र थोरवे यांनी पाठपुरावा करत सदर प्रस्ताव अंतर्गत श्री वरद विनायक मंदिर, महड या पवित्र स्थळी जतन, संवर्धन व परिसर व्यवस्थापनासाठी २८ कोटी २४ लाख ६३ हजार ७३५.५९ रुपये इतकी रक्कम मंजूर करण्यात आल्याने या ऐतिहासिक निर्णयासाठी महायुती सरकारचे गणेश भक्तांच्या वतीने आभार मानले.

# तब्बल १९ वर्षांनी एकत्र येत माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा

**दैनिक युवक आधार**
**राम ढाकणे**
**उरण, रायगड.**




क्रषी पंडीत भागुजी राव ढेकळे माध्यमीक व उच्चमाध्यमीक विद्यालय पाङळशिंगी तालुका गेवराई जिल्हा बीड येथील एका निसर्गरम्य वातावरणामध्ये वसलेलं शैक्षणिक ज्ञानमंदिर आहे.

या विद्यालयाची मुहूर्तमेढ १९८४ साली बीड जिल्ह्याचे कै.माजी खासदार सौ.केसरकाकु क्षीरसागर यांनीया परिसरातील शैक्षणिक गरज लक्षात घेऊन अतिशय दुरगामी विचार करून या विद्यालयाची स्थापना केली... या विद्यालयातील सन २००६ यावर्षीच्या बारावीच्या बॅचमधील मुलांनी सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हाट्सअँप ग्रुप तयार केला. आणि एकत्र येण्यासाठी चर्चा सुरू झाली आणि ठरले १ जुन २०२५ हा दिवस निश्चित करण्यात आला. या दिवशी अतिशय उत्साहात सर्व मुले मुली विद्यालयाचा प्रांगणात एकत्र आली अतिशय देखणा कार्यक्रम संपन्न झाला.. कार्यक्रमाचे अध्यक्ष के पी बी डी हायस्कूल चे प्राचार्य श्री.आण्णासाहेब थिटे सर हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षक श्री.दिपक लाटे सर आणी श्री.राऊत सर ,त्याचबरोबर संध्या कार्यरत असलेले श्री. घायाळ सर श्री.मुंढे सर उपस्थित होते. . महापुरुषांचे प्रतीमा पूजन व दिप प्रज्योलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली... सर्व प्रमुख पाहुण्यांचे मार्गदर्शन झाले त्यानंतर माजी विद्यार्थ्यांनी आपल्या भूतकाळातील आठवणींना उजाळा दिला. प्रत्येकाने आपापल्या आठवणी सांगताना आपला परिचय देऊन सध्या काय करतं आहे हे सांगितले. प्रत्येकाला आयुष्यात संघर्षशिवाय यश मिळत नाही. परंतू आपण ज्या भूमीत शिक्षणं घेतले ती अतिशय पवित्र आणि प्रेरणादायी आहे. आज वेगवेगळया क्षेत्रात प्रत्यकजन काही ना काही उद्योग व्यवसाय करतं आहे. कोणी शिक्षक , पोलीस, लेखाधीकारी ,कुणाचा स्वतःचा व्यवसाय आहे तर कुणी कुशल प्रगतशील शेतकरी आहेत. माणसाने आयुष्यात कितीही मोठ झालं तरी आपले पाय हे जमिनीवर असले पाहिजे. शिक्षणाने माणूस ज्ञानवंत कीर्तिवंत झाला परंतू अंगी विनम्रता असावी तसेच आपल्या मातृभूमीप्रति कायम ऋणी असावे अशी अपेक्षा शिक्षकानी मनोगतात व्यक्त केली. १९ वर्षानंतर आपण एकत्र येऊन एवढा छान कार्यक्रम घेतला हे खूप मोठी गोष्ट आहे... जीवनभर माणूस हा काही ना काही शिकत असतो. ज्यांच्यामुळे आपण घडलो त्यांचे स्मरण कायम असले पाहिजे. अतीशय खेळीमेळीच्या वातावरनात कार्यक्रम पार पडला . कार्यक्रमाचे सूत्रसंचालन याच बॅचचे माजी विद्यार्थि सुरेश भोपळे यांनी केले. आणी कार्यक्रमाचे प्रास्ताविक याच बॅचचे माजी विद्यार्थ्यी नानासाहेब थिटे यांनी केले तर प्रमुख पाहुण्यांचे आभार अनिल घोडके यानी मानले. शेवटी यथेच्छ भोजनाचा आस्वाद घेतला. आणी विद्यार्थ्यांकडून शाळेतसाठी छोटीशी भेट म्हणून ११ खुर्ची चा शेट प्रदान केला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ईश्वर घाङगे तसेच सर्वांनी एकजुटीने प्रयत्न केले आणि कार्यक्रम पार पडला.

# समर्थ पॉलिटेक्निकला राष्ट्रीय स्तरावरील मानांकन

### एन बी ए मानांकन करणारे उत्तर पुणे जिल्ह्यातील ग्रामीण भागातील पहिले खाजगी तंत्रनिकेतन..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी डॉ. वेदांत ओव्हाळ**
**वाडा सुरकुंडी.**




समर्थ रूरल एज्युकेशनल इन्स्टिट्यूट संचलित समर्थ पॉलिटेक्निक,बेल्हे (बांगरवाडी) या तंत्रनिकेतन महाविद्यालयाचे नुकतेच नॅशनल बोर्ड ऑफ एक्रीडीशन (एन.बी.ए.) या राष्ट्रीय पातळीवरील समितीकडून पाहणी करण्यात आली व पाहणीमध्ये संस्थेचे कामकाज उत्कृष्ट वाटल्याने एन बी ए कडून सन २०२८ पर्यंत कॉम्प्युटर इंजिनिअरिंग मेकॅनिकल इंजिनिअरिंग,इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग या अभ्यासक्रमाना मानांकन करण्यात आले अशी माहिती संस्थेचे सचिव विवेक शेळके यांनी दिली. एन.बी.ए. समितीमध्ये चेअरमन म्हणून नवी दिल्लीच्या प्रोफेसर डॉ. प्रेरणा गौर,मध्यप्रदेश चे डॉ.डी.एस.भिलारे,गुजरात चे डॉ.कौशिक पटेल आदींचा समावेश होता. यापूर्वी २०२२ ते २०२५ या कालावधी करता समर्थ पॉलिटेक्निकला एन बी ए चे मानांकन प्राप्त झाले होते आणि आता २०२८ पर्यंत एनबीएचे पुनश्च मानांकन प्राप्त झालेले आहे. एन बी ए समितीने समर्थ पॉलिटेक्निक मध्ये उपलब्ध असलेल्या सर्व सुविधा त्याचबरोबर अध्ययन-अध्यापन प्रक्रिया,रिसर्च ऍण्ड कन्सल्टन्सी,भौतिक सुविधा,विद्यार्थ्यांचा फिडबॅक,आउट कम बेस्ड एज्युकेशन,सीओ-पीओ मॅपींग,प्लेसमेंट याचे मूल्यमापन केले. त्याचबरोबर कार्यशाळा,ग्रंथालय,अद्ययावत व सुसज्ज प्रयोगशाळा,ऑफीस,जिमखाना,कॅन्टीन,क्रीडा विभाग,मुलांनी केलेले प्रोजेक्ट,कॉम्प्युटर,मेकॅनिकल,इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग व सायन्स विभागाचे लॅब यांची पाहणी केली.तसेच महाविद्यालयामार्फत देण्यात येणाऱ्या बस सुविधा,हॉस्टेल सुविधा,उद्योग व्यवसायाच्या समन्वयाने उभारलेल्या प्रयोगशाळा,आऊटडोअर व इंडोअर क्रिडांगणे या सुविधांवरती समाधान व्यक्त केले. समर्थ पॉलिटेक्निक मध्ये कॉम्प्युटर इंजिनीरिंग, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन इंजिनिअरिंग,मेकॅनिकल इंजिनिअरिंग, सिव्हिल इंजिनिअरिंग ,मेकाट्रॉनिक्स, इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग इ.अभ्यासक्रम शिकवले जातात. गुणवत्तापूर्ण तांत्रिक शिक्षण व विद्यार्थी-शिक्षक-पालक यांच्यामधील सुसंवाद यामुळे संस्थेने प्लेसमेंट,उत्कृष्ट निकाल,शासकीय,अशासकीय,खाजगी शिष्यवृत्ती,सेमिनार, औद्योगिक सहली,तज्ञ मार्गदर्शन, ऑनजॉब ट्रेनिंग, इंटर्नशिप प्रोग्रॅम यांसारख्या इ.उपक्रमांचे या समितीने कौतुक केले. विशेष करून मोठ्या प्रमाणावर विद्यार्थ्यांना नोकऱ्या प्राप्त होत आहेत याचा समितीने विशेष उल्लेख करत सर्वांचे कौतुक केले. मूल्यांकन यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी प्राचार्य अनिल कपिले,प्रा. संजय कंधारे,एन.बी.ए.समन्वयक प्रा.श्याम फुलपगारे,प्रा.नंदकिशोर मुन्हेकर,प्रा.संकेत विघे,सर्व विभागप्रमुख,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

संस्थेचे अध्यक्ष वसंतराव शेळके,उपाध्यक्ष माऊली शेठ शेळके,सचिव विवेक शेळके,विश्वस्त वल्लभ शेळके,माजी जिल्हा परिषद सदस्य स्नेहल ताई शेळके,कॅम्पस डायरेक्टर प्रा.राजीव सावंत तसेच संकुलातील सर्व प्राचार्य,विभागप्रमुख,शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सर्वांचे अभिनंदन केले व भावी वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या.

# वादळी वाऱ्यामुळे सोलार पॅनलचे नुकसान ,

### के.एस.बी. कंपनी चे उदासीन धोरण , नुकसानीचे पंचनामे अद्याप नाही.

**दैनिक युवक आधार**
**किनवट ता.प्रतिनीधी:**
**-विशाल भालेराव**









तालुक्यातील दुर्गापेठ पारडी येथील शेतकरी नारायण भुमारेड्डी आपतवार यांच्या मालकी गट नंबर ५० मधील विहिरीवर के.एस.बी.कंपनीचे सोलार पॅनल लावलं होतं बुधवार २१ मे रोजी रात्री सुरू झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे सोलार पॅनल मोडून पडले, नुकसान संबंधि शेतकरी नारायण भुमारेड्डी आपतवार यांनी संबंधित कंपनीशी संपर्क साधला असता त्यांचा कोणताही कर्मचारी व अधिकारी बारा दिवस झाले तरी पंचनामा करण्यासाठी जाय मोक्यावर आला नाही.संबंधित कंपनीने हलक्या दर्जाचे साहित्य शेतकऱ्यांना दिले असून ऐन खरिप हंगामाच्या तोंडावर शेतकरी नारायण आपतवार यांचं ८० हजाराचे नुकसान झाले आहे . महावितरण कडुन मागेल त्याला सोलार संच महा कृषी उर्जा अभियान अंतर्गत पी.एम.कुसुम योजनेतून नारायण आपतवार यांना सोलार संच मिळालं त्यावर त्यांचं कृषी पंप सुरळीत चालू होते .सोलार पॅनलमुळे शेतकऱ्यांच्या विकासात भर पडेल अशी आशा होती.परंतू बुधवार २१ मे रोजी रात्री सुरू झालेल्या वादळी वाऱ्यासह पावसामुळे सोलार पॅनल मोडून पडले, के.एस.बी. कंपनीने हलक्या दर्जाचे सोलार साहित्य शेतकऱ्यांच्या माथी मारलं असुन वादळी वाऱ्यामुळे सोलार पॅनल मोडून पडले आहे.ऐन खरिप हंगामाच्या तोंडावर शेतकरी नारायण आपतवार यांचं ८० हजाराचे नुकसान झाले आहे . नुकसान होऊन दहा बारा दिवस झाले असून महावितरण, कृषी विभाग, महसूल मधील कोणताही कर्मचारी, अधिकारी ,शेतकरी नारायण आपतवार यांच्या बांधावर पंचनामा करण्यासाठी आला नाही.